रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १८ ◆ अंक २०४
www.ramprahar.com

◆ मंगळवार, १० फेब्रुवारी २०२६ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२


## अंतरंग

अलिबागमध्ये शेकापचा दारूण पराभव/२

म्हसळा तालुक्यात राष्ट्रवादीचा बोलबाला/५

माणगाव पंचायत समितीवर शिवसेनेचा भगवा/७

## आजपासून बारावीची परीक्षा; शिक्षण मंडळ सज्ज



**पुणे** : महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वतीने घेण्यात येणाऱ्या बारावीच्या परीक्षेला मंगळवार (दि.१०)पासून सुरुवात होत आहे. राज्यात एकूण १५ लाख ३२ हजार ४८७ विद्यार्थी यंदा बारावीची परीक्षा देणार आहेत. ३३८७ परीक्षा केंद्रावर ही परीक्षा होईल. यातील सात लाख ९९ हजार ७७३ विद्यार्थी विज्ञान शाखेचे आहेत. ३,८०,६९२ विद्यार्थी कला शाखेची परीक्षा देणार आहेत, तर ३,२०,१५२ विद्यार्थी वाणिज्य शाखेचे आहेत. किमान कौशल्य आणि आयटीआय टेक्निकल सायन्सचेही काही विद्यार्थीही परीक्षा देतील. काही पेपर सकाळी ११ वाजता आणि काही दुपारी ३ वाजता असणार आहेत. विद्यार्थ्यांना अर्धा तास आधी परीक्षा केंद्रावर उपस्थित रहावे लागणार आहे. पेपर सुरू झाल्यानंतर १० मिनिटे वाचनासाठी वेळ दिला जाणार आहे. परीक्षेच्या शेवटी हा वेळ जोडला जाईल.

# पनवेलमध्ये जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीत
# भाजप महायुतीचा ऐतिहासिक विजय





(अधिक छायाचित्रे पान ८ वर..)

## शेकापचा सुपडा साफ! 'एकच वादा प्रशांतदादा'चा जयघोष!!

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

**पनवेल तालुक्यात जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या सार्वत्रिक निवडणुकीत भाजप महायुतीने शेतकरी कामगार पक्षप्रणित महाविकास आघाडीचा दारुण पराभव करत ऐतिहासिक विजय मिळवला आहे. जिल्हा परिषदेच्या आठपैकी आठ, तर पंचायत समितीच्या १६पैकी १५ जागांवर भाजप महायुतीने विजय मिळवला. दीर्घकाळ शेकापच्या ताब्यात असलेला गड महायुतीने उद्ध्वस्त करत शेकापचा सुपडा साफ केला असून पनवेल पंचायत समितीवर एकहाती सत्ता प्रस्थापित केली आहे.**

### विरोधकांच्या नकारात्मक राजकारणाला मतदारांनी नाकारले

या निवडणुकीत शेकाप महाविकास आघाडीने लोकशाही मूल्यांना तिलांजली देत विकासाच्या मुद्द्यांवर चर्चा करण्याऐवजी खोटे आरोप, अफवा आणि अपप्रचाराची राळ उडवण्याचे काम केले होते. समाजात संभ्रम निर्माण करून मतदारांची दिशाभूल करण्याचा प्रयत्न केला. याउलट भाजप महायुतीने लोकशाही मार्गाचा अवलंब करत राज्यातील आणि देशातील विकासकामांचा ठोस लेखाजोखा जनतेसमोर मांडला. पायाभूत सुविधा, रोजगारनिर्मिती, शेतकरी, महिला, युवक, उद्योग, शिक्षण व आरोग्य या सर्व क्षेत्रांतील विकासकामे आणि भविष्यातील स्पष्ट दृष्टिकोन ठेवून महायुतीने निवडणूक लढवली. विरोधकांच्या नकारात्मक राजकारणाला मतदारांनी स्पष्टपणे नकार दिला असून विकास, स्थैर्य आणि सक्षम नेतृत्वावर विश्वास दाखवला आहे. हा निकाल म्हणजे लोकशाही मार्गाने, सकारात्मक विचारांनी आणि विकासाच्या अजेंड्यावर लढवलेल्या समाजकारणाच्या विजयाचे प्रतिक असल्याची प्रतिक्रिया व्यक्त होत आहे.

या विजयामुळे पनवेल तालुक्यात शेकापची जुलमी व दडपशाहीची सत्ता उलथवून लावण्यात भाजप महायुतीला मोठे यश मिळाले आहे जनतेने विकास, पारदर्शकता व सक्षम नेतृत्वावर आपला ठाम विश्वास व्यक्त केला. निवडणूक निकालानंतर संपूर्ण पनवेल तालुक्यात आनंदोत्सवाचे वातावरण निर्माण झाले. भाजप महायुतीचा विजय असो, एकच वादा प्रशांतदादा अशा जोरदार घोषणा देत कार्यकर्त्यांनी जल्लोष साजरा केला.

राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, भाजप जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, ज्येष्ठ नेते जे.एम. म्हात्रे, राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत, पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर, माजी विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे यांच्या नेतृत्वाखाली भाजप महायुतीने हा देदीप्यमान विजय मिळवला.

भाजप महायुती नेतृत्वाने पनवेल तालुक्यात विकास, पायाभूत सुविधा, शेतकरी, युवक व महिला सक्षमीकरण या मुद्द्यांवर विश्वासार्ह भूमिका मांडली. याच भूमिकेला मतदारांनी भरभरून प्रतिसाद देत महायुतीला स्पष्ट कौल दिला आहे. या विजयामुळे आगामी काळात पनवेल तालुक्याच्या सर्वांगीण विकासाला गती मिळणार असून जनतेच्या अपेक्षांना न्याय देण्यासाठी महायुती कटिबद्ध राहील, असा विश्वास या वेळी व्यक्त करण्यात आला. **(पान २ वर..)**

> *पनवेल तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या आठही जागांवर भाजप महायुतीने विजय मिळविला, तर पंचायत समितीमध्ये १६पैकी १५ जागांवर आमचे उमेदवार निवडून आले. या यशाचे किंगमेकर आम्ही नाही, तर पंतप्रधान नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण आहेत. महायुती म्हणून आम्ही विजय मिळवला. सर्व नेते, पदाधिकारी, कार्यकर्त्यांच्या मेहनतीचा हा विजय आहे. निश्चितपणे या विजयाचा आनंद काही वेगळाच आहे. भाजपच्या निवडून आलेल्या सर्व उमेदवारांचे मी अभिनंदन करतो तसेच जनतेचे आभार मानतो.*
>
> **-प्रशांत ठाकूर, आमदार**

## राज्यातील जनतेचा पुन्हा एकदा महायुतीवर विश्वास

**मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्रातील जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीचा निकाल सोमवारी (दि.९) लागला. यामध्ये भाजप आणि महायुतीने घवघवीत यश संपादन केले आहे. याबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रतिक्रिया देत विश्लेषण केले.

मुख्यमंत्री म्हणाले की, महाराष्ट्रातील जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्यांचे निकाल हाती येत आहेत. आता मोजणीचा शेवटचा टप्पा चालू आहे. आतापर्यंत हाती आलेले निकाल आणि अंतिम टप्प्यातील कल लक्षात घेता

### मुख्यमंत्री फडणवीसांनी केले निकालाचे विश्लेषण



महाराष्ट्रातील जनतेने पुन्हा एकदा महायुतीवरच आपला विश्वास दाखवला आहे. १२ जिल्हा परिषदांमध्ये भाजप पुन्हा एकदा सर्वात मोठा पक्ष म्हणून स्थापित झाल्याचे पहायला मिळत आहे आणि बाराही जिल्हा परिषदांमध्ये महायुतीचीच सत्ता येईल, हे स्पष्ट झाले आहे. **(पान २ वर..)**

## रायगड झेडपी त्रिशंकू; सत्तेच्या चाव्या भाजपकडे



**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा परिषदेच्या निवडणुकीचा निकाल सोमवारी (दि. ९) लागला. कोणत्याही पक्षाला बहुमत मिळालेले नाही. शिवसेना शिंदे गट २१ जागा जिंकून सर्वात मोठा पक्ष ठरला आहे. त्या खालोखाल राष्ट्रवादी काँग्रेसने १६, तर भाजपने १५ जागा जिंकल्या आहेत. गेली अनेक वर्षे रायगड जिल्हा परिषदेत सत्तेत असलेला शेकाप या निवडणुकीत एकही जागा जिंकू शकला नाही. कोणत्याच पक्षाला बहुमत नसल्यामुळे जिल्हा परिषदेच्या सत्तेच्या चाव्या भाजपच्या हाती आल्या आहेत.

रायगड जिल्हा परिषदेच्या ५९ जागांसाठी १७३ उमेदवार निवडणूक रिंगणात होते. या निवडणुकीसाठी ७ फेब्रुवारी रोजी मतदान झाले, तर सोमवारी १५ केंद्रांवर मतमोजणी होऊन निकाल जाहीर करण्यात आला. शिवसेना शिंदे गटाने सर्वाधिक २१ जागा जिंकल्या. हा पक्ष मोठा पक्ष ठरला असला तरी त्यांना सत्तास्थापनेसाठी इतर पक्षांवर अवलंबून राहावे लागणार आहे. राष्ट्रवादी काँग्रेसने १६ जागा जिंकल्या आहेत. भाजपने १५ जागी विजय मिळविला. शिवसेना ठाकरे गटाला पाच, तर काँग्रेसला दोन जागांवर समाधान मानावे लागले आहे.






# अलिबागमध्ये शेकापचा दारूण पराभव

## जि.प.च्या सर्व जागा गमावल्या | पंचायत समितीतील सत्ता राखण्यातही अपयश

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा परिषद निवडणूकीत शेतकरी कामगार पक्षाचा आलिबाग तालुक्यात सुफडा साफ झाला आहे. शेकापला जिल्हा परिषदेच्या सात पैकी एकही जागा जिंकता आली नाही. अलिबाग तालुका पंचायत समितीवर गेले कित्येक वर्षे असलेली सत्ता गमावण्याची नामुष्की शेकापरवर आली. अलिबाग तालुक्यात जिल्हा परिषदेच्या ७ जागांपैकी ६ जागा शिवसेनेने जिंकून आपली ताकद दाखवून दिली. एक जागा राष्ट्रवादी काँग्रेसने जिंकली. शेकापच्या बालेकिल्ल असलेल्या अलिबाग पंचायत सिमितीवर सत्ता मिळवून शिवसेनेने इतिहास घडवला.

अलिबाग तालुक्यात जिल्हा परिषदेच्या सात जागा आहेत. त्यापैकी पाच जागा शेकपने लढल्या. दोन जागा त्यांनी महाविकास आघाडीतल घटक पक्षांना सोडल्या आहेत. या सर्व जागांवर महाविकास आघाडीचा पराभव झाला. शेकापला एकी जागा जिंकता आली नाही. अलिबाग पंचायत समितीच्या १४ जागपैकी केवळ एक जागा शेकापने जिंकली. एक जागा भाजपने जिंकली. १२ जागा जिंकत अलिबाग पंचायत समितीवर एकहाती सत्ता मिळवून शिवसनेने इतिहास घडवला आहेत. जिल्हा परिषद निवडणूकीत शिवसेना ठाकरे गटाचे जिल्हा प्रमुख सुरेंद्र म्हात्रे, भाजपाच्या महिला आघाडी जिल्हा अध्यक्ष सौ. चित्रा पाटील, काँग्रेसचे ज्यष्ठ उपध्यक्ष राजा ठाकूर यांचा पराभव पत्कारावा लागला आहे. शिवसेनेचे आमदार महेंद्र दळवी यांनी आपली ताकद दाखवून दिली आहे. आमदार महेंद्र दळवी यांच्या पत्नी सौ. मानसी दळवी व सून सौ. आदिती दळवी विजयी झाल्या. जिल्हा परिषद निवडणूकीत सासू व सून निवडून येण्याचा इतिहास या दोघींनी घडवला आहे.



**जिल्हा परिषद विजयी उमेदवार**

शहापूर – अमित अशोक नाईक (राष्ट्रवादी काँग्रेस) , आवास – दिलीप विठ्ठल भोईर उर्फ छोटम शेठ (शिवसेना, शिंदे गट ), आंबेपूर – सौ. रसिका राजा केणी, (शिवसेना शिंदे गट) , चौल – सचिन शरद राऊळ (शवसेना शिंदे गट), कावीर – अनंत नारयण गोंधळी (शिवसेना शिंदे गट), थळ – सौ. मानसी महेंद्र दळवी ( शिवसेना शिंदे गट,) चेंढरे – सौ. आदिती नाईक दळवी ( शिवसेना शिंदे गट)

**पंचायत समिती विजयी उमेदवार**

वैजाळी – प्रकाश चंद्रसेन पाटील( शिवसेना शिंदे गट) , शहापूर – भाग्यता नंदन पाटील ( शिवसेना शिंदे गट), रूईशेत भोमोली – कृष्णा जानू लोभी ( शिवसेना शिंदे गट), आवास – प्रिया प्रमोद भगत ( शिवसेना शिंदे गट) , किहीम – स्नेहा संतोष रूत ( शिवसेना शिंदे गट) , थळ – वैशाली विशाल कटवटे ( शिवसेना शिंदे गट), वरसोली – प्रियांका संदेश गुंजाळ ( शिवसेना शिंदे गट), चेढरे – प्रियदर्शनी संजय पाटील (भाजपा), अक्षी – जयंत उर्फ समा नारायण वार्डे ( शिवसेना शिंदे गट), रेवदंडा – शरद पांडुरंग गोंधळी ( शिवसेना शिंदे गट), चौल – अंकीता अंकूश घरत ( शिवसेना शिंदे गट) , कावीर – संतोष चंद्रकांत निगडे( शिवसेना शिंदे गट), रामराज – अंजली रामचंद्र पाटील (शेकाप).

# पेणमध्ये जि.प. आणि पं.स. निवडणुकीत भाजपचे वर्चस्व

**पेण : प्रतिनिधी**

जिल्हा परिषद पंचायत समिती निवडणूक निकाल जाहीर झाला असून पाचपैकी चार जागा जिंकत भाजपने आपले वर्चस्व राखले आहे. पंचायत समिती गणात भाजपने १० पैकी ८ जागा जिंकत सत्ता कायम राखण्यात यश मिळवले आहे. दादर जिल्हा परिषद मतदार संघात भाजप महामंत्री वैकुंठ पाटील यांनी ८ हजार ५५३ मतांचे बहुमत प्राप्त केले आहे.

यावेळी आमदार रविशेठ पाटील यांनी प्रतिक्रिया देताना सांगितले कि, देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी, राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस व प्रांताध्यक्ष रविंद्र चव्हाण यांच्या नेतृत्वखाली रायगड जिल्ह्यात भाजपची घोडदौड जोमाने सुरु असून पेणमध्ये विकासकामांच्या जोरावर यश प्राप्त झाले असून भाजप राष्ट्रवादी व मित्रपक्षांची आघाडी या निवडणुकीत झाली असून आघाडीचं कायम राहील जिते जिल्हा परिषद गटात ताई जोमा दरवडा (भाजप) यांना १३७८४ तर पंचायत समिती गणात भाजपचे संजय कमलाकर डंगर ५१२४ मते (विजयी) तर वाकळ पंचायत समिती गणात कमळ दत्ता पवार (भाजप) ७३०८ मते विजयी झाले आहेत. दादर जिल्हा परिषद गटात वैकुंठ रवींद्र पाटील १४३५५ मते (भाजप) विजयी तर पंचायत समिती गणात भाजपच्या स्मिता प्रमोद पाटील ७११८ मते (विजयी) आणि अस्मिता प्रल्हाद पाटील ६३३१ मते (भाजप) विजयी झाले. महलमिऱ्या डोंगर जिल्हा परिषद गटात भाजपचे जनार्दन बुध्या भस्मा १३३३३ मते ( विजयी) आणि पंचायत समिती गणात भाजपचे सुशांत खाकर ७७७७ ( विजयी), मेघा मच्छिंद्र पाटील ६२६२ (मते) विजयी झालेत. वडखळ जिल्हा परिषद गणात भाजपचे प्रभाकर वासुदेव म्हात्रे (हरी ओम ) ८१०७ मते ( विजयी) आणि पंचायत समिती गणात भाजपचे विवेक सदानंद म्हात्रे ५६७३ मते (विजयी) आणि प्रदीप मधुकर म्हात्रे ३६१२ मते ( विजयी) झालेत.शिहू जिल्हा परिषद गटात शिवसेना उबाठा पक्षाच्या पल्लवी प्रसाद भोईर १२५९५ (विजयी), डोलवी पंचायत समिती गणात शिवसेना (उबाठा) प्रीती पाटील ६९५७ आणि शिहू पं. स. गणात संजय भोईर ( शिवसेना उबाठा) विजयी झाले



# कर्जत पंचायत समितीवर परिवर्तन विकास आघाडीची निर्विवाद सत्ता

## जिल्हा परिषदेच्याही सर्व सहा जागा जिंकल्या

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यात जिल्हा परिषद, पंचायत समितीच्या निवडणुका शांततेत पार पडल्या. या निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस–उद्धव सेना–स्वाभिमानी रिपब्लिकन पार्टी व मित्र पक्ष अशा कर्जत परिवर्तन विकास आघाडीने बारापैकी दहा जागा जिंकून निर्विवाद सत्ता मिळविली. तर जिल्हा परिषदेच्या सहापैकी सहा जागा जिंकत एकहाती वर्चस्व सिद्ध केले आहे. या निवडणुकीत परिवर्तन विकास आघाडी विरुद्ध महायुती अशी लढत पहायला मिळाली. शिवसेना शिंदे गट आणि शेतकरी कामगार पक्षाला पंचायत समितीच्या प्रत्येकी एका जागेवर समाधान मानावे लागले. आमदार महेंद्र थोरवे यांच्या थोरले बंधू माजी उपसभापती मनोहर थोरवे यांच्या सुनबाई श्वेता प्रसाद थोरवे यांनाही पराभव पत्करावा लागला.



**निकाल : जिल्हा परिषद**

९ कळंब–नारायण डामसे, राष्ट्रवादी अजित पवार गट (विजयी)
१० कशेळे–वर्षा दोरे, राष्ट्रवादी अजित पवार गट (विजयी)
११ माणगाव तर्फे वरेडी– सुवर्णा ठाकरे, राष्ट्रवादी अजित पवार गट (विजयी)
१२ नेरळ–सुनीता मोरे, शिवसेना उद्धव ठाकरे गट (विजयी)
१३ कडाव –मारुती घारे, शिवसेना उद्धव ठाकरे गट (विजयी)
१४ मोठे वेणगाव–उषा ठोंबरे, राष्ट्रवादी अजित पवार गट (विजयी)

**कर्जत पंचायत समिती**

१७ पोशिर–रेश्मा जोशी, शेतकरी कामगार पक्ष (विजयी)
१८ कळंब –कमल शिंगवा, शिवसेना उद्धव ठाकरे गट (विजयी)
१९ पाथरज –कविता पादीर, राष्ट्रवादी अजित पवार गट (विजयी)
२० कशेळे –अक्षय तिटकारे, राष्ट्रवादी अजित पवार गट (विजयी )
२१ माणगाव तर्फे वरेडी –महेश विरले, शिवसेना शिंदे गट ( विजयी )
२२ उक्रूळ – नमिता श्रीखंडे, शिवसेना उद्ध ठाकरे गट ( विजयी )
२३ नेरळ –भगवान चंचे, राष्ट्रवादी अजित पवार गट (विजयी)
२४ दामत–महेश खारीक, राष्ट्रवादी अजित पवार गट (विजयी)
२५ वाकस – नितिन धुळे, राष्ट्रवादी अजित पवार गट (विजयी)
२६ कडाव–सुषमा पवाळी, शिवसेना उद्धव ठाकरे गट (विजयी)
२७ मोठे वेणगाव चित्रा ठाकरे, शिवसेना उद्धव ठाकरे गट (विजयी)
२८) बिड बुद्रक –नमिता घारे, राष्ट्रवादी अजित पवार गट (विजयी)

# पोलादपूरमध्ये शिवसेना युतीला दोन जि.प., चार पं.स. जागांवर यश

**पोलादपूर : प्रतिनिधी**

शिवसेनेचे मंत्री भरत गोगावले यांनी महाड विधानसभा मतदारसंघात विजयी चौकार मारल्यानंतर राजिपचे माजी उपाध्यक्ष चंद्रकांत कळंबे यांनीही जिल्हा परिषदेच्या निवडणुकीमध्ये चौकार मारला आहे. प्रथमच जिल्हा परिषद निवडणूक लढणारे डॉ.निलेश कुंभार यांनी ३८७६ मतांची आघाडी घेऊन आतापर्यंत सर्वात जास्त मताधिक्य मिळविणारा विजय संपादन केला.



शिवसेना शेकाप युतीमुळे पोलादपूर पंचायत समितीमध्ये घवघवीत यश मिळाले असून शिवसेनेच्या तीन आणि शेकापक्षाची एक असे चारही उमेदवार निवडून आले. मंत्री भरतशेठ गोगावले यांनी पोलादपूर येथील शिवछत्रपतींच्या अश्वारूढ पुतळयाजवळ सर्व विजयी उमेदवारांचे अभिनंदन करून महाड पोलादपूर तालुक्यातील सर्व विजय उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा वाढदिवस असल्याने भेट दिल्याची प्रतिक्रिया व्यक्त केली.

पोलादपूर तालुक्यातील कापडे बुद्रुक जिल्हा परिषद गटात शिवसेनेचे निलेश कुंभार यांना ७ हजार ९४९ मते मिळाली तर प्रतिस्पर्धी राष्ट्रवादी काँग्रेसचे उमेदवार अजय सलागरे यांना ४ हजार ०७३ मते मिळून निलेश कुंभार यांना आतापर्यंतचे सर्वाधिक ३ हजार ८७६ मताधिक्य मिळाले आहे.

माटवण पं.स.गणात शेकाप व शिवसेना युतीच्या शेकाप उमेदवार साक्षी कांबळेकर यांनी ३ हजार ३३५ मते मिळवून राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाच्या हर्षदा वरवाटकर यांचा तब्बल १ हजार २११ मताधिक्याने पराभव केला.

कापडे बुद्रुक पं.स.गणात शिवसेनेचे अनिल दळवी यांनी ४ हजार ४२५ मते मिळवून राष्ट्रवादी काँग्रेसचे अनिल मालुसरे यांचा २ हजार ४२१ मताधिक्याने पराभव केला.

**शिवसेनेचे चंद्रकांत कळंबे यांचा विजयी चौकार**

लोहारे जि.प. गटात आतापर्यंत सर्वाधिक चर्चेत राहिलेल्या या जिल्हा परिषद गटातील निवडणुकीमध्ये चंद्रकांत कळंबे यांनी भाजप राष्ट्रवादी युतीचे उमेदवार कृष्णा कदम यांचा २ हजार ८६ मताधिक्य घेत दारूण पराभव केला.

लोहारे पं.स.गणातील शिवसेनेच्या अनिता अनिल भिलारे यांनी राष्ट्रवादी काँग्रेसच्या युगझा दीपक उतेकर यांचा ७९२ मताधिक्याने पराभव केला.कोतवाल पं.स.गणात शिवसेनेचे अविनाश शिंदे यांनी भाजपच्या सुरेंद्र चव्हाण यांचा १ हजार २२१ मतांनी पराभव केला.

# आजपासून बारावीची परीक्षा : जिल्ह्यात ३३ हजार १२१ परीक्षार्थी, ५२ परीक्षा केंद्र

**अलिबाग : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे घेण्यात येणारी १२ वी ची परीक्षा मंगळवारपासून (दि. १०) सुरु होत आहे. १८ मार्च पर्यंत ही परीक्षा सुरु राहणार आहे. रायगड जिल्ह्यात बारावीच्या परीक्षेला ३३ हजार १२१ परीक्षार्थी बसले आहेत. जिल्ह्यात ५२ परीक्षा केंद्रांवर ही परीक्षा होणार आहे.

सर्व केंद्रांवर आवश्यक सोयीसुविधा, सुरक्षा व्यवस्था आणि नियंत्रण यंत्रणा उभारण्यात आली आहे. सर्व परीक्षा केंद्रांवर पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. ज्या वर्गखोल्यांमध्ये परीक्षा होणार आहे, त्या प्रत्येक खोलीत सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यात आले आहेत. या कॅमेऱ्यांचे फुटेज जिल्हाधिकारी कार्यालय, पोलीस अधीक्षक कार्यालय आणि शिक्षण विभागाकडून थेट मॉनिटर केले जाणार आहे. याशिवाय काही संवेदनशील केंद्रांवर ड्रोनद्वारे देखरेख ठेवण्यात येणार असल्याची माहिती प्रशासनाने दिली आहे.

कॉपी रोखण्यासाठी जिल्ह्यात एकूण २४ भरारी पथके नियुक्त करण्यात आली आहेत. यामध्ये विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक आणि शिक्षण उपसंचालक यांच्या नेतृत्वाखालील ९ उच्चस्तरीय पथकांचा समावेश आहे.

पान १ वरुन

## भाजप महायुतीचा ऐतिहासिक विजय

गव्हाण जिल्हा परिषद गटातून निकिता निलेश खारकर, वावंजे जिल्हा परिषद गटातून कमला एकनाथ देशेकर, नेरे जिल्हा परिषद गटातून आत्माराम बाळू भस्मा, पाली देवद जिल्हा परिषद गटातून प्राची अमित जाधव, पळस्पे जिल्हा परिषद गटातून हर्षदा अतुल घरत, वावेघर जिल्हा परिषद गटातून अनन्या अविनाश गाताडे, वडघर जिल्हा परिषद गटातून सोनाली अनुज जितेकर, केळवणे जिल्हा परिषद गटातून मंगेश रामचंद्र वाकडीकर यांनी, तर गव्हाण पंचायत समिती गणातून जिज्ञासा किशोर कोळी, वहाळ पंचायत समिती गणामधून वितेश त्रिंबक म्हात्रे, वावंजे पंचायत समिती गणातून आरती कुणाल काठे, चिंध्रण गणातून अंकुश बाळाराम खैर, नेरे पंचायत गणातून वर्षा सचिन केवारे, आदई गणातील भूपेंद्र सदानंद पाटील, पाली देवद पंचायत समिती गणातून वैशाली प्रवीण सावंत, विचुंबे पंचायत समिती गणातून निलम प्रमोद भिंगारकर, पळस्पे पंचायत समिती गणातून राजेंद्र हरिश्चंद्र पाटील, कोन पंचायत समिती गणातून योगिता योगेश लहाने, वावेघर पंचायत समितीमधून राजू गणा पाटील, पोयंजे पंचायत समितीमधून अस्मिता अनंता पाटील, करंजाडे पंचायत समितीमधून रंजना सदाशिव वास्कर, वडघर पंचायत समितीमधून मनिषा गजानन पाटील आणि आपटा पंचायत समिती गणामधून मयुर परशुराम शेलार यांनी दणदणीत विजय मिळवला.

सर्व विजयी उमेदवारांचे लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, माजी नगराध्यक्ष जे.एम. म्हात्रे, भाजपचे जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, ज्येष्ठ नेते वाय.टी. देशमुख, राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत, जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, ॲड. प्रकाश बिनेदार, उपाध्यक्ष जयंत पगडे, पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर, माजी विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे यांच्यासह नगरसेवक–नगरसेविका, पदाधिकारी, कार्यकर्ते व ग्रामस्थांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीकरिता शुभेच्छा दिल्या. या वेळी पनवेलमध्ये ढोलताशा, फटाक्यांची आतषबाजी आणि जयजयकाराच्या घोषणांनी विजयी जल्लोष साजरा करण्यात आला. ज्येष्ठ नेते जे.एम. म्हात्रे यांनी जल्लोषाच्यावेळी 'सुपडा साफ किया रे' अशी जोरदार प्रतिक्रिया दिली.

पनवेल पंचायत समितीवर शेकापची अनेक वर्षे सत्ता राहिली, मात्र पंचायत समितीच्या माध्यमातून विकास दूरच राहिला. त्यामुळे शेकापच्या मनमानी कारभाराला जनता पुरती कंटाळली होती. नुकत्याच पार पडलेल्या पनवेल महापालिकेच्या निवडणुकीतही शेकाप महाविकास आघाडीचा दारुण पराभव झाला होता. त्यातच ताज्या निकालाने शेकापची पूर्ण दैना उडाली आहे. माजी आमदार बाळाराम पाटील यांच्या कार्यपद्धतीला पनवेलची जनता कंटाळली असल्याने हा निकाल त्याचे बोलके चित्र असल्याची चर्चा पनवेलमध्ये रंगली आहे.

## राज्यातील जनतेचा पुन्हा एकदा महायुतीवर विश्वास

छत्रपती संभाजीनगर, सिंधुदुर्ग, सांगली, धाराशिव, परभणी, सातारा जिल्ह्यात जवळपास ६० ठिकाणी भाजप एक नंबरवर आहे. शिवसेना रत्नागिरी आणि रायगड अशा दोन ठिकाणी नंबर एकवर आहे, तर राष्ट्रवादी काँग्रेस पुण्यात नंबर एकवर आहे. जेथे तीनही पक्ष एकत्र लढलो अशा कोल्हापूर आणि लातूर येथे महायुतीच नंबर एकवर आहे, असे सांगून मुख्यमंत्र्यांनी सांगितले की, भारतीय जनता पक्षाने आपला २०१७चा रेकॉर्डदेखील मोडला आहे. २०१७ साली या जिल्हा परिषदांमध्ये भाजपला १४१ जागा होत्या, पण आतापर्यंत घोषित झालेल्या निकालांमध्येच २३६ जागा भाजपला मिळाल्या आहेत.

पंचायत समिती निवडणूक निकालाबद्दल बोलताना मुख्यमंत्र्यांनी म्हटले की, २०१७ साली भाजपच्या एकूण २८४ जागा होत्या, पण आतापर्यंतच्या जाहीर झालेल्या कलांमध्ये ४१० जागा भाजपला मिळालेल्या आहेत. साधारणपणे १२५ पंचायत समित्यांचा कल बघितला तर यापैकी ५० पंचायत समिती भाजपकडे, २६ शिवसेनेकडे आणि २३ राष्ट्रवादी काँग्रेसकडे असतील. बाकी प्रत्येकी सात–आठ काँग्रेस आणि शरद पवारांच्या पक्षाकडे, तर पाच ठाकरे गटाकडे असतील. त्यामुळे इथेदेखील महायुतीला १२५ पैकी १००च्या वर पंचायत समिती जिंकता आल्या आहेत. एकूणच महाराष्ट्राच्या ग्रामीण भागाची मानसिकता यामधून समोर आली आहे, असेही मुख्यमंत्र्यांनी नमूद केले.

# गिरीस्थान माथेरानमध्ये आजपासून हातरिक्षांसह ई–रिक्षाचालकांचा बेमुदत बंद

**माथेरान : रामप्रहर वृत्त**

माथेरान मधील हात रिक्षा व ई रिक्षा चालकांनी ई रिक्षामध्ये वाढ व्हावी या करता सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार सहा महिने वाट पाहिल्यानंतर आता शेवटचे हत्यार म्हणून सरसकट सर्व रिक्षा बेमुदत बंद ठेवण्याचा निर्णय घेतला असून त्यानुसार हात रिक्षा व ई रिक्षा १० तारखेपासून बेमुदत बंद करण्यात येणार असल्याचे रिक्षा संघटनेने जाहीर केले आहे.



माथेरानमध्ये ९४ परवाना धारक हात रिक्षा आहेत , ज्यापूर्वीपासून येथे चालत आहेत, पूर्वी अशिक्षित व बेरोजगार स्थानिक या रिक्षा खेचण्याचे काम करत असतात त्यावेळी रोजगारी कमी प्रमाणात उपलब्ध असल्याने हाच रिक्षा व्यवसाय तेजीत होता. कालांतराने ही सर्व मंडळी वयस्कर झालेत व त्यांची पुढील पिढी शिक्षित झाल्याने या व्यवसायाकडे फार कमी लोक उपलब्ध होत होती त्यामुळेच या शिक्षित तरुणांना रिक्षा खेचण्याचा हा व्यवसाय गुलामगिरी प्रमाणे वाटू लागला होता.

त्याकरिता सन्मान जनक व्यवसाय मिळावा म्हणून रिक्षा संघटनेने न्यायालयामध्ये धाव घेत पर्यावरण पूरक ई रिक्षा उपलब्ध व्हाव्यात याकरिता दाद मागितली प्रदीर्घ न्यायालयीन लढा लढल्यानंतर न्यायालयाने ई रिक्षा साठी सकारात्मक निकाल देताना प्रायोगिक तत्त्वावर सात रिक्षा सुरू करण्यास राज्य शासनाला सुचविले. या सात रिक्षा शासनामार्फत वर्षभर चालविण्यात आल्या. त्याचा अहवाल सकारात्मक दिल्यानंतर ९४ रिक्षा मालकांपैकी २० जणांची लकी ड्रॉ काढून निवड करत वीस रिक्षा सुरू करण्यात आल्या. त्याला आता एक वर्षाहून अधिक काळ लोटला आहे.

बाकीच्या ७४ रिक्षा चालकांवर हा अन्याय झाल्याने त्यांनीही अनेक वेळा विद्रोही भूमिका मांडली होती परंतु हा निर्णय न्यायालयाकडे असल्याने संघटनेचे हात बांधले होते.परंतु माजी सरन्यायाधीश भूषण गवई यांनी निर्णय घेताना सहा महिन्यांमध्ये सर्व सोपस्कार पूर्ण करत राज्य शासनाने गरजू लोकांना व या ७४ रिक्षा चालकांना ई–रिक्षा उपलब्ध करून द्याव्यात असा निर्णय जाहीर केला होता.


> **रिक्षा बंद आंदोलन जाहीर करून आठ दिवसांचा कालावधी लोटला असून अजूनपर्यंत कोणत्याही शासकीय अधिकाऱ्यांनी संघटनेशी संपर्क साधला नसून यातूनच अधिकाऱ्यांची मानसिकता दिसून येत आहे, पण आता न्यायासाठी ही लढाई आम्ही एकजुटीने लढणार**
> **–शकील पटेल अध्यक्ष,**
> रिक्षा चालक मालक संघटना

# खारघर वसाहतीत पाणीटंचाईची समस्या

## सिडकोकडून अपुऱ्या पुरवठ्यामुळे सोसायटीतील नागरिक त्रस्त

**पनवेल : वार्ताहर**

गेल्या काही महिन्यांपासून खारघर वसाहतीत पाणीटंचाईची समस्या अधिक तीव्र होत आहे. यावर मात करण्यासाठी अनेक गृहनिर्माण सोसायट्यांनी बोअरवेल जोडणीचा पर्याय स्वीकारला आहे. सिडकोकडून कमी दाबाने होणारा पाणीपुरवठा, तसेच पुढील काही दिवसांत उन्हाळा सुरू होणार आहे. उन्हाळ्यात सिडकोकडून रहिवाशांना पुरेसे पाणी मिळत नसल्याने सोसायट्यांवर स्वतःची पर्यायी व्यवस्था उभारण्याची वेळ आली आहे.



खारघर वसाहतीच्या लोकसंख्येत वाढ होत आहे. त्यात खारघर वसाहतीमधील पाणी अप्पर खारघर आणि तळोजा जात असल्यामुळे रहिवाशांना वसाहतीला उपलब्ध करून दिल्या पुरेसा पाणीपुरवठा होत नाही. त्यामुळे अनेक सेक्टरमध्ये रहिवासी सोसायट्यांमध्ये पिण्याच्या व घरगुती वापराच्या पाण्यासाठी मोठ्या प्रमाणावर टँकरवर अवलंबून रहावे लागत होते, मात्र टँकरचे वाढते दर आणि अनिश्चित वेळेमुळे रहिवाशांची गैरसोय होत आहे.

काही सोसायटी पदाधिकाऱ्यांच्या माहितीनुसार, बोअरवेलमुळे सोसायटीमधील स्वच्छता, बागकाम, वाहन, तसेच कपडे धुणे आदी वापरासाठी लागणारे पाणी, तसेच टँकरवरील खर्चात काही प्रमाणात बचत होत असून, रहिवाशांवरील आर्थिक ताण कमी झाला आहे. काही सोसायट्यांनी पावसाळ्यात रेनवॉटर हार्वेस्टिंगची ही व्यवस्था केली असून, भूजल पातळी टिकवून ठेवण्याचा प्रयत्न सुरू आहे.

बोअरवेल्समुळे तात्पुरता दिलासा मिळत असला तरी, योग्य नियोजनाशिवाय मोठ्या प्रमाणावर भूजल उपसा केल्यास भविष्यात गंभीर परिणाम भोगावे लागू शकतात. त्यामुळे बोअरवेल वापरासोबतच पाणी बचतला प्राधान्य देणे आवश्यक असल्याचे मत पर्यावरण अभ्यासक व्यक्त करीत आहेत. तथापि भूजलाचा अतिवापर टाळण्याचा, इशारा दिला आहे.

**न्हावाशेवा टप्पा ३ अंतर्गत नवीन पाईपलाईनचे काम सुमारे ७०% पूर्ण झाले आहे. उर्वरित काम मे महिन्याच्या अखेरीस पूर्ण होणार असून त्यानंतर पाण्याची सध्या भासत असलेली कमतरता पूर्णपणे दूर होईल.**
**-ब्रिजेश पटेल,**
भाजप जिल्हा सचिव

# शेडुंग टोलनाक्यावर दोन किमीपर्यंत रांगा

## संतप्त वाहनचालकांकडून बॅरियर उचलून विनाटोल वाहतूक

**पनवेल : वार्ताहर**

मुंबई-पुणे महामार्गावर पनवेल तालुक्यातील शेडुंग टोलनाक्यावर मोठा गोंधळ उडाल्याची घटना घडली. टोल वसूली अत्यंत संथगतीने सुरू असल्याने महामार्गावर सुमारे दोन किलोमीटरपर्यंत वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या. यामुळे वाहनचालकांचा संयम सुटला आणि संतप्त नागरिकांनी थेट टोल प्रशासनाविरोधात आक्रमक भूमिका घेतली.

सकाळपासूनच टोलनाक्यावर कर्मचारी अपुऱ्या संख्येने कार्यरत असल्याने आणि टोल वसुलीत हलगर्जीपणा होत असल्याचा आरोप वाहनचालकांनी केला. कार्यालये, शाळा, उद्योगधंदे आणि इतर महत्त्वाच्या कामांसाठी निघालेल्या नागरिकांना प्रचंड विलंबाचा सामना करावा लागला. वाहतूक ठप्प झाल्याने परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. अखेर संतप्त वाहनचालक रस्त्यावर उतरले आणि टोल बॅरियर उचलून काही काळासाठी टोल न भरताच वाहने पुढे सोडली.



या वेळी टोल कर्मचारी आणि वाहनचालकांमध्ये जोरदार शाब्दिक चकमक झाली. या प्रकारामुळे जुना मुंबई-पुणे महामार्गावरील वाहतूक पूर्णपणे विस्कळीत झाली होती. अनेक वाहनचालक तासनतास अडकून पडले होते. घटनेची माहिती मिळताच प्रशासन आणि वाहतूक पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत परिस्थिती नियंत्रणात आणली. टोलनाक्यावर अतिरिक्त कर्मचारी तैनात करून आणि वाहतूक व्यवस्थापन केल्यानंतर हळूहळू वाहतूक सुरळीत करण्यात आली.

दरम्यान, शेडुंग टोलनाक्यावर वारंवार होत असलेली वाहतूक कोंडी, अपुरी व्यवस्था आणि कर्मचाऱ्यांचा निष्काळजीपणा यामुळे नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. टोल वसुली सुरू ठेवायची असेल तर योग्य नियोजन, पुरेसे कर्मचारी आणि वेगवान सेवा देणे गरजेचे असल्याची मागणी वाहनचालकांकडून करण्यात येत आहे.

## निवडक

### मुलीवर अत्याचार; आरोपीला अटक

**पनवेल :** १४ वर्षीय मुलीसोबत कौटुंबिक मैत्री करून तिच्यावर अत्याचार करणाऱ्या आरोपीला कामोठे पोलिसांनी अलिबाग रोडवरून अटक केली. १४ वर्षीय पीडित मुलगी कामोठे परिसरात राहण्यास असून आरोपी मनीष शंकर वारीया (वय २८ राहणार रसायनी) याने तिच्यासोबत मैत्री करत शारीरिक संबंध प्रस्थापित केले. याची माहिती मिळाल्यानंतर कामोठे पोलीस ठाण्यात सात जानेवारी रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. पोलिसांनी आरोपी मनीष वारीया याला अटक केली. सध्या तो न्यायालयीन कोठडीत आहे.

### अल्पवयीन मुलीला पळवले

**पनवेल :** एका १५ वर्षीय अल्पवयीन मुलीला कोणीतरी अज्ञात आरोपीने फुस लावून पळवून नेल्याची घटना पनवेल शहरामध्ये घडली आहे. अलिशा तौसिफ तबीब असे या अल्पवयीन मुलीचे नाव असून तिचे वय १५ वर्षे, उंची ५ फुट अंदाजे, रंग सावळा, चेहरा उभट, बांधा मध्यम, केस काळे लांब, नाक सरळ, अंगात निळा पंजाबी ड्रेस, काळी पॅन्ट तसेच बुरखा परिधान केलेला आहे. या मुलींबाबत कोणाला काही माहिती असल्यास पनवेल शहर पोलीस ठाणे किंवा पोलीस उप निरीक्षक हजरत पठाण (९८२३१९३८८८) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

### महापौर, उपमहापौरपदाची निवडणूक

**पनवेल :** महानगरपालिकेच्या महापौर व उपमहापौर पदासाठी निवडणूक प्रक्रिया मंगळवार, १० फेब्रुवारी २०२६ रोजी पार पडणार आहे. यासाठी पनवेल महानगरपालिकेची विशेष सर्वसाधारण सभा क्रमांक ०१ पीठासीन अधिकारी जिल्हाधिकारी ठाणे मा. डॉ. श्रीकृष्णनाथ पांचाळ यांच्या अध्यक्षतेखाली ११ वाजता पनवेल येथील आद्य क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह येथे आयोजित करण्यात आली आहे.

# पनवेल महापालिका नवनिर्वाचित नगरसेवकांचा विशेष सत्कार

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रायगड जिल्हा तायक्वांदो असोसिएशनतर्फे बेल्ट परीक्षा आयोजित करण्यात आली होती. या परीक्षेमध्ये जिल्ह्यातील सुमारे २००० विद्यार्थी सहभागी झाले होते. या कार्यक्रमात पनवेल महापालिकेचे भावी महापौर नितीन पाटील, उपमहापौर प्रमिला पाटील आणि नवनिर्वाचित नगरसेवकांचा विशेष सत्कार संघटनेच्या वतीने करण्यात आला.

या सोहळ्याला आमदार प्रशांत ठाकूर, भाजपचे जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, माजी विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे, पनवेल महानगरपालिकेचे भावी महापौर नितीन पाटील, उपमहापौर प्रमिला पाटील यांच्यासह नवनिर्वाचित नगरसेवक उपस्थित होते. या वेळी मान्यवरांच्या हस्ते तायक्वांदो स्पर्धेतील पदक विजेत्या खेळाडूंचा आणि लोकप्रतिनिधींचा सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला.



या कार्यक्रमाला संजीवनी इंटरनॅशनल स्कूलचे मुख्याध्यापक डॉ. अनुराग पांड्ये, तायक्वांदो पंच सुभाष पाटील, प्रशिक्षक अनिल म्हात्रे, संतोष पालेकर, प्रशांत घरत, तेजस माळी, रूपेश माळी, राकेश जाधव, प्राजक्ता अंकोलेकर, निलेश जाधव यांच्यासह संघटनेचे पदाधिकारी आणि मान्यवर उपस्थित होते.

या वेळी नितीन पाटील, प्रमिला पाटील, रामदास शेवाळे, रवींद्र भगत, मनोज भुजबळ, समीर ठाकूर, विजय खानावकर, ममता म्हात्रे, प्रीती जॉर्ज, सरस्वती काथारा, मोनिका महानवर, हेमलता गोवारी आणि सायली सरक यांचा सत्कार करण्यात आला.



**पनवेल : तालुका अखिल भंडारी सेवा मंडळ आयोजित कौटुंबिक स्नेहसंमेलन २०२६ कार्यक्रम पनवेल येथे उत्साहात झाला. या कार्यक्रमाला आमदार प्रशांत ठाकूर यांची उपस्थिती लाभली. त्यांचा आयोजकांकडून सत्कार करण्यात आला.**



**खारघर : येथे श्री गजानन महाराजांच्या प्रकट दिनानिमित्त आमदार प्रशांत ठाकूर यांनी उपस्थित राहून दर्शन घेतले. त्यांनी सर्व भाविकांना प्रकट दिनाच्या मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या. या वेळी भाजप पदाधिकारी, कार्यकर्ते, भक्तगण उपस्थित होते.**

# उरण तालुक्यात भाजपच्या रिना घरत, कैलास भोईर विजयी

**उरण : वार्ताहर**

उरण तालुक्यातील चार जिल्हा परिषदेच्या जागांसाठी निवडणूक प्रक्रिया शांततेत पार पडली. जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुकीत सोमवारी (दि. ९) मतमोजणी होऊन चाणजे जिल्हा परिषदेच्या निवडणुकीत भाजपच्या उमेदवार रिना जितेंद्र घरत (मिळालेली मते १०,०६९) या विजयी झाल्या आहेत. तर चाणजे पंचायत समिती गणातून भाजपचे उमेदवार कैलास मोरेश्वर भोईर (मिळालेली मते ४७५१) हे विजयी झाले आहेत.

दरम्यान, भाजपच्या विजयी उमेदवारांचे आमदार महेश बालदी यांनी अभिनंदन केले. या वेळी उपनगराध्यक्ष रवी भोईर, शहर अध्यक्ष कौशिक शाह, नगरसेवक राजेश ठाकूर, गणेश पाटील, माजी जिल्हा परिषद सदस्य विजय भोईर, विभागीय अध्यक्ष जितेंद्र घरत, माजी नगरसेवक नवीन राजपाल, कार्यकर्ते प्रितम पाटील आदी उपस्थित होते.

निवडणूक निर्णय अधिकारी आविशकुमार सोनोने, सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तथा तहसीलदार डॉ. उध्दव कदम यांनी निवडणुकीचा निकाल जाहीर केल्यानंतर भाजप महायुतीचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी विजयी उमेदवारांचे अभिनंदन केले आणि पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.



# रामशेठ ठाकूर महाविद्यालयात एआयच्या वापरासंदर्भात सेमिनार

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात शनिवारी (दि.७) अकाउंट व फायनान्स विभागाच्या वतीने आर्टिफिशल इंटेलिजन्स इन फायनान्स व ॲप्लिकेशन्स ॲण्ड फ्युचर ट्रेंड्स या विषयावर एकदिवसीय सेमिनारचे यशस्वी आयोजन करण्यात आले होते.



या सेमिनारसाठी नार्सी मोंजी इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज येथील सहाय्यक प्राध्यापक सी. एस. डॉ. स्वप्निल शेणवी हे प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित होते. या सेमिनारमध्ये एकूण ५५ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. सेमिनारचा मुख्य उद्देश कृत्रिम बुद्धिमत्ता या संकल्पनेची सविस्तर ओळख करून देणे तसेच वित्त क्षेत्रात तिचा वाढता वापर आणि भविष्यातील प्रवाह समजावून सांगणे हा होता.

या वेळी त्यांनी आपल्या मार्गदर्शनपर व्याख्यानातून वित्तीय सेवा क्षेत्रामध्ये एआयचा कसा प्रभावी वापर होत आहे, याची माहिती दिली. जोखीम व्यवस्थापन, फसवणूक शोध प्रणाली, गुंतवणूक विश्लेषण, अल्गोरिदमिक ट्रेडिंग आणि ग्राहक सेवा यांसारख्या क्षेत्रांतील एआयच्या विविध उपयोगांवर त्यांनी प्रकाश टाकला. सेमिनार माहितीपूर्ण, प्रेरणादायी आणि भविष्योन्मुख ठरला, अशी प्रतिक्रिया सहभागी विद्यार्थ्यांनी व्यक्त केली. महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. महेश्वरी झिरपे यांनी या उपक्रमाच्या आयोजन केल्याबद्दल अकाउंट व फायनान्स विभागातील सर्व शिक्षक व विद्यार्थी यांचे अभिनंदन केले व शुभेच्छा दिल्या.

या सेमिनारचे आयोजन प्रा. डॉ. प्रवर शर्मा यांनी केले तसेच अकाउंट व फायनान्स विभागातील इतर सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी विद्यार्थ्यांनी उपस्थित राहून सहकार्य केले.

# सीकेटी कॉलेजमध्ये मोफत हृदय तपासणी व ईसीजी चाचणी शिबिर

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खांदा कॉलनीमधील चांगू काना ठाकूर (सीकेटी) कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय (अधिकारप्रदत्त स्वायत्त) येथे कर्मचारी संस्था आणि कल्याण समितीच्या वतीने मोफत हृदय तपासणी व ईसीजी चाचणी शिबिराचे आयोजन शनिवारी (दि.७) करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते प्रतिमा पूजनाने करण्यात आली.



कार्यक्रमाला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. के. पाटील यांची प्रमुख उपस्थिती लाभली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व पाहुण्यांची ओळख कर्मचारी संस्था आणि कल्याण समिती प्रमुख, डॉ. राजेंद्र ओ. परमार यांनी करून दिली.

शिबिराच्या प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित असलेल्या नवीन पनवेल येथील माधवबाग हृदयविकार आणि बहुवैशिष्ट्यपूर्ण चिकित्सालय उपचार केंद्राच्या प्रतिबंधात्मक हृदयरोगतज्ज्ञ डॉ. सुनिता ए. पाटील यांनी वेळीच तपासणी आणि संतुलित जीवनशैली हाच निरोगी हृदयाचा खरा मंत्र आहे, असे प्रतिपादन केले.

हृदयविकार टाळण्यासाठी नियमित तपासणी, आहार-विहाराचे संतुलन व तणावमुक्त जीवनशैली यांचे महत्त्व विशद केले. आजच्या धावपळीच्या जीवनात हृदयाकडे दुर्लक्ष होत असून वेळोवेळी तपासणी केल्यास अनेक गंभीर आजार टाळता येतात, असे त्यांनी मार्गदर्शनात नमूद केले.

महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. डॉ. एस. के. पाटील यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात आरोग्याचे महत्त्व सर्व उपस्थितांना पटवून दिले. या शिबिरात महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवून मोफत हृदय तपासणी व ईसीजी चाचणीचा लाभ घेतला. या कार्यक्रमासाठी माधवबाग पनवेल शाखेच्या प्रोप्रायेटर शिल्पा चंदने, डॉ. अपेक्षा पवार आणि श्रुती मावळे या उपस्थित होत्या.

महाविद्यालयाच्या अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक डॉ. बी. डी. आघाव, वाणिज्य विभागाचे प्रमुख डॉ. एस. बी. यादव, विज्ञान विभागाच्या प्रमुख डॉ. जे. एस. ठाकूर यांच्यासह महाविद्यालयातील अनेक प्राध्यापकदेखील या उपक्रमासाठी उपस्थित होते.

सूत्रसंचालन मराठी विभागाच्या प्राध्यापिका नम्रता कडू आणि आभार प्रदर्शन डॉ. श्वेता व्ही. हुंबरवाडी यांनी केले. या उपक्रमामुळे कर्मचाऱ्यांमध्ये हृदयआरोग्याविषयी जागरूकता निर्माण होण्यास मदत झाली, असे मत उपस्थितांनी व्यक्त केले.

## संपादकीय

# महायुतीवरच विश्वास

सुमारे दोन दशकांपूर्वी 'शहरी मध्यमवर्गीयांचा पक्ष' असे भारतीय जनता पक्षाबद्दल म्हटले जात असे. मात्र आता महापालिका आणि नगरपालिका निवडणुकांपाठोपाठ राज्यातील १२ जिल्हा परिषदा आणि त्याअंतर्गत येणाऱ्या १२५ पंचायत समित्यांच्या निवडणुकांमध्येही भाजपनेच प्रथम क्रमांक मिळवल्याचे स्पष्ट झाले आहे. राज्यातील ग्रामीण जनतेनेही महायुती सरकारच्या कामगिरीवर शिक्कामोर्तब केले असून महाविकास आघाडीच्या पराभवांची मालिका कायम राहिलेली दिसते आहे.

**राज्यभरातील १२ जिल्हा परिषदा आणि १२५ पंचायत समिती निवडणुकांचा निकाल सोमवारी जाहीर झाला. नुकत्याच पार पडलेल्या महापालिका आणि नगरपालिका निवडणुकांमध्ये भारतीय जनता पक्षाने बाजी मारली होती. आता ग्रामीण भागाचा कणा असलेल्या जिल्हा परिषदा आणि पंचायत समिती निवडणुकांमध्येही भाजपच सर्वात मोठा पक्ष ठरला असून राज्यातील जनतेने महायुतीवरच विश्वास व्यक्त केल्याचे स्पष्ट झाले आहे. राज्यातील ५० टक्के आरक्षणाच्या मर्यादेत असलेल्या छत्रपती संभाजीनगर, परभणी, धाराशीव, लातूर, पुणे, सातारा, सांगली, सोलापूर, कोल्हापूर, रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग या १२ जिल्हा परिषदा आणि त्याअंतर्गतच्या १२५ पंचायत समितींसाठी ७ फेब्रुवारीला मतदान पार पडले होते. महापालिका निवडणुकांमध्ये मतदानाचा टक्का घसरल्याबद्दल चिंता व्यक्त होत असतानाच जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांसाठी मात्र मतदार मोठ्या प्रमाणात बाहेर पडले. या निवडणूक निकालांमधून ग्रामीण भागाची मानसिकताही भाजपला अनुकूल असल्याचे स्पष्ट झाले आहे. राज्यातील महायुती सरकारच्या कामावर ग्रामीण जनतेनेही शिक्कामोर्तब केले आहे. हे यश पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या ग्रामविकासाच्या दृष्टिकोनाचे आहे. पूर्वी भाजपचा उल्लेख शहरी मध्यमवर्गीयांचा पक्ष असा होत असे. पण आता मात्र चित्र पुरते पालटले आहे हे मान्य करावेच लागेल. दरम्यान उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या दुर्दैवी निधनानंतर पुणे जिल्ह्यात त्यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला मोठे यश मिळालेले दिसून आले. निवडणुकांच्या निकालाला अजित पवार यांच्या अपघाती निधनाच्या दु:खाची किनार असल्यामुळे भाजपने निकालांनंतर मोठे सेलिब्रेशन न करण्याचा निर्णय घेतला. अजितदादांच्या आकस्मिक निधनामुळे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह भाजपच्या प्रमुख नेत्यांनी निवडणुकीत फारसा प्रचार केला नाही. तरीही पुणे जिल्हा वगळता साखरपट्ट्यातील सातारा, सोलापूर या जिल्ह्यांमध्येही भाजपने स्पष्ट बहुमत मिळवले. मराठवाड्यातही भाजपने यश मिळवले आहे. कोकणात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेने चांगली कामगिरी केली. पनवेल तालुक्यात मात्र जिल्हा परिषदेच्या ८ पैकी ८ जागा तसेच पनवेल पंचायत समितीच्या १६ पैकी १५ जागांवर भाजपने विजय मिळवला. रायगड जिल्हा परिषदेत शिवसेना शिंदे गटाने २१, राष्ट्रवादी काँग्रेसने १६ तर भाजपने १५ जागा जिंकल्या आहेत. शिंदेंची शिवसेना येथे मोठा पक्ष ठरली असली तरी सत्ता महायुतीचीच असेल. महाविकास आघाडीची पराभवांची मालिका या जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांमध्येही कायम राहिली आहे. राज्यात विरोधक फक्त माध्यमांमध्ये दिसतात. त्यांच्यात लढण्याच्या इच्छाशक्तीचा अभाव दिसतो असे उद्गार फडणवीस यांनी निकालांनंतर पहिली प्रतिक्रिया व्यक्त करताना काढले. २०१७ च्या निवडणुकांमधील आपलाच रेकॉर्ड भाजपने यंदाच्या जिल्हा परिषद निवडणुकीत मोडला असल्याचे सांगत फडणवीस यांनी पक्षाच्या कामगिरीबद्दल आनंद व्यक्त केला. पंचायत समिती निवडणुकीतही भाजपने मोठी उडी घेतली असून आता उर्वरित २२ जिल्हा परिषद निवडणुका कधी होणार याकडे लक्ष असेल.**

# वंदे मातरम सुरक्षित तटम समृद्ध भारतम सायक्लोथॉन २०२६



केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दलाच्या वतीने 'वंदे मातरम सुरक्षित तटम समृद्ध भारतम' सायक्लोथॉन २०२६ उपक्रम राबविण्यात येत आहे. यासाठी सीआयएसएफची दोन सायकलिंग पथके एकाच वेळी बक्खली (पश्चिम बंगाल) आणि लखपत (गुजरात) येथून निघाली आहे. हे पथक एकत्रितपणे भारताच्या पूर्व आणि पश्चिम किनारपट्टीवर सुमारे ६,५०० किलोमीटरचा प्रवास करणार आहे. ज्यामध्ये ९ किनारी राज्ये आणि २ केंद्रशासित प्रदेशांचा समावेश असून २२ फेब्रुवारी २०२६ रोजी कोची (केरळ) येथे सायक्लॉथॉनचा समारोप होईल. महाराष्ट्रात हे सायकलपटूंचे पथक १० फेब्रुवारी ते १४ फेब्रुवारी दरम्यान प्रवास करणार आहे. पालघर जिल्ह्यातील जुचंद्र गावापासून सायकलपटूंच्या प्रवासाची सुरुवात होणार आहे. 'सीआयएसएफ' चा सायक्लोथॉन उपक्रम राष्ट्रीय जनजागृती आणि जागरूकता आणण्यासाठी अत्यंत महत्त्वाचा आहे.

यामध्ये सायकलपटूंचे दोन्ही संघ देशातील निसर्गरम्य किनारी मार्गांवरून सायकल चालवतील, प्रमुख बंदर शहरे, मासेमारी गावे आणि ऐतिहासिक स्थळांमधून जातील आणि नंतर कोचीमध्ये त्यांचा प्रवास संपेल. सीआयएसएफ वंदे मातरम् कोस्टल सायक्लोथॉन २०२६ उपक्रमाचा उद्देश भारताच्या संपूर्ण किनारपट्टीवर प्रवास करणे आहे. यामध्ये नऊ किनारी राज्ये आणि चार केंद्रशासित प्रदेशांमध्ये प्रवास समाविष्ट आहे.

### 'सीआयएसएफ' कोस्टल सायक्लोथॉन-२०२६ चे उद्दिष्ट

अमली पदार्थ, शस्त्रे आणि स्फोटकांच्या तस्करीसारख्या धोक्यांबद्दल किनारी समुदायांना संवेदनशील बनविणे आणि दक्षतेला प्रोत्साहन मिळावे, असा आहे. यासह मजबूत किनारी सुरक्षा जाळ्यासाठी किनारी समुदाय आणि सुरक्षा यंत्रणांमधील सहभाग अधिक मजबूत करणे, स्वातंत्र्य सैनिक, शहीद, सुरक्षा कर्मचारी आणि त्यांच्या कुटुंबियांच्या बलिदानाचा आदर करून वंदे मातरमची भावना जागृत करणे, भारताचा समृद्ध सागरी वारसा, परंपरा, इतिहास याविषयी जनजागृती निर्माण करणे, देशाच्या सागरी समृद्ध वारसामध्ये समुदायांचे, विशेषतः मच्छीमारांचे असलेले अमूल्य योगदान अधोरेखित करणे, तरुणांमध्ये आणि किनारी प्रदेशात वास्तव्यास असलेल्या समुदायांमध्ये, तंदुरुस्ती, शिस्त आणि निरोगी जीवनशैलीला प्रोत्साहन देण्याचाही आहे. या उपक्रमात किनारी प्रदेशात वास्तव्यास असलेल्या समुदायांची विशेषतः मच्छिमारांची देशाचे तट प्रहरी म्हणून महत्त्वाची भूमिका अधोरेखित करण्यात आला आहे.

यावर्षी आयोजित करण्यात आलेल्या सायक्लोथॉनचा मुख्य आधारस्तंभ म्हणजे सामुदायिक सहभाग आहे. या प्रवासादरम्यान, सायक्लोथॉन ५२ किनारी गावांमध्ये थांबेल, ही गावे सीआयएसएफ दत्तक घेईल. ऑईल अँड नॅचरल गॅस कॉर्पोरेशन (ओएनजीसी), बंदर प्राधिकरणे आणि इतर सागरी यंत्रणांसारख्या प्रमुख भागधारकांशी समन्वय साधून, स्थानिक सीआयएसएफ सामाजिक उत्तरदायित्व (सीएसआर) उपक्रमांद्वारे समर्थित, समुदाय कल्याण आणि पायाभूत सुविधा विकास उपक्रम हाती घेणार आहेत. भारताच्या किनारपट्टीजवळ ४७ सीआयएसएफ युनिट्स असल्याने, हे दल या दत्तक घेतलेल्या गावांशी सतत आणि दीर्घकालीन संबंधातून जनजागृती विषयक उपक्रमाची अंमलबजावणी करणार आहे.

### सामाजिक जागरूकता आणि पर्यावरणीय जबाबदारीचे महत्त्व

तरूण आणि सामान्य नागरिकांन ाराष्ट्रउभारणीच्याउपक्रमांमध्ये सहभागी होण्यास प्रोत्साहितकरण्यासाठी भरती जागरूकतामोहीम,क्रीडाउपक्रम आणि युवा संवादकार्यक्रमआयोजितकेलेजातील. युवा पोहोच योजनेत जागरूकताकार्यक्रम, सांस्कृतिक कार्यक्रम, स्वच्छ भारत मोहीम, वृक्षारोपण मोहीम आणि अंमली पदार्थांचा वापर आणि तस्करीविरुद्ध उपक्रम, किनारी समुदायांमध्ये सामाजिक जागरूकता, स्वच्छता आणि पर्यावरणीय जबाबदारी वाढवणे यांचा समावेश आहे. या उपक्रमातून तरुणांमध्ये सामाजिक जागरूकता आणि पर्यावरणीय जबाबदारीचे महत्त्व पटवून देण्यात येणार आहे.

### महिला सक्षमीकरण आणि समावेशकता

युवा सहभाग आणि महिला सक्षमीकरण हे सायक्लोथॉनचे प्रमुख केंद्रबिंदू आहेत. विशेष म्हणजे, सहभागी सायकलस्वारांपैकी ५० टक्के महिला आहेत, जे राष्ट्रीय सेवा उपक्रमांमध्ये 'जेंडर इक्वलिटी' आणि महिला सक्षमीकरणाच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल टाकल्याचे निदर्शनास येत आहे. नेतृत्वाखालील सार्वजनिक संवादाद्वारे, सायक्लोथॉन नागरिकांना शिस्त, शारीरिक तंदुरुस्ती आणि राष्ट्रसेवेची भावना स्वीकारण्यास प्रेरित करण्याचा प्रयत्न या उपक्रमामधून करण्यात येणार आहे.

### प्रमुख कार्यक्रम आणि लोकसहभाग

सायक्लोथॉनचा कोची येथे समारोप होण्यापूर्वी, मुंबई, गोवा, मंगळुरू, कोणार्क, विशाखापट्टणम आणि चेन्नई येथे होणाऱ्या प्रमुख कार्यक्रमांमध्ये क्रीडा, संस्कृती, चित्रपट उद्योगातील उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींचा सहभाग असणार आहे. सीआयएसएफ वंदे मातरम् कोस्टल सायक्लोथॉन -२०२६ हा उपक्रम २०४७ च्या विकसित भारताचे प्रतिबिंब दर्शविणारा ठरणार आहे. या उपक्रमातून किनारी प्रदेशांना सुरक्षा विषयक बळकटी मिळणार असून येथील समुदायांना सक्षम बनवले जात असल्याचा संदेश मिळत आहे. सतर्क, तंदुरुस्त आणि जबाबदार नागरिक निर्माण करण्यासाठी हा उपक्रम निश्चितच मदतगार ठरणार आहे.

भारताच्या किनारपट्टीवर असलेले रिफायनरीज, शिपयार्ड आणि अणुऊर्जा प्रकल्पांसह ही बंदरे भारताच्या आर्थिक विकासासाठी आणि ऊर्जा सुरक्षेसाठी महत्त्वाची आहेत. तथापि, त्यांना अमली पदार्थ, शस्त्रे, स्फोटके, घुसखोरी आणि इतर बेकायदेशीर कारवाया यासारख्या सततच्या धोक्यांचा सामना करावा लागतो. मागील पाच दशकांहून अधिकच्या काळापासून सीआयएसएफकडे किनारपट्टीवरील १२ प्रमुख बंदरे आणि इतर महत्त्वाच्या पायाभूत सुविधांचे संरक्षण करण्याची जबाबदारी सोपवण्यात आली आहे. पहिल्या सीआयएसएफ कोस्टल सायक्लोथॉनच्या यशावर आधारित, २०२६ ची आवृत्ती ही ऐतिहासिक ठरणार असून लोक चळवळीच्या रूपात पुढे येत आहे. हा उपक्रम नव्या संकल्पाने आणि मजबूत राष्ट्रीय संबंधाने पुढे नेत आहे.

भारताच्या किनारपट्टीवर २० कोटींहून अधिक लोक राहतात आणि मासेमारी, नौवहन, पर्यटन आणि किनारी संसाधनांद्वारे देशाच्या अर्थव्यवस्थेत महत्त्वपूर्ण योगदान देतात. ' ब्लू इकॉनॉमी' ही आपल्या सागरी परिसंस्थांचे संरक्षण करताना या किनारी संसाधनांचा वापर करण्यासाठी एक शाश्वत दृष्टिकोन दर्शवते.या सायक्लोथॉनद्वारे सीआयएसएफचे उद्दिष्ट किनारी सुरक्षा, पर्यावरण संवर्धन आणि आपल्या सागरी संसाधनांच्या क्षमतेचे महत्त्व लक्षात आणून देणे आहे.

भारत सरकारने आंतरराष्ट्रीय नौवहन आणि बंदर सुरक्षा नियमांनुसार सीआयएसएफला मान्यताप्राप्त सुरक्षा संघटनेचा कार्यभार सोपवला आहे. हे सायक्लोथॉन महत्त्वाच्या किनारी प्रतिष्ठानांचे रक्षण करण्याच्या आणि त्यात भारताच्या किनारी समुदायांचे प्राधान्य सुनिश्चित करण्याच्या वचनबद्धतेचे प्रतिबिंब आहे.

सायक्लोथॉन केवळ एक क्रीडा स्पर्धा नाही. हे आपल्या देशाच्या किनारी समुदायांना समर्पित आहे. शाश्वत किनारी विकासासाठी कृती करण्याचे आवाहन,किनारी सुरक्षेबद्दल जागरूकता आणि आपल्या विविध राष्ट्राला एकत्र बांधणाऱ्या एकतेच्या भावनेचे प्रदर्शन आहे.

**-निलेश तायडे,**
**विभागीय संपर्क अधिकारी**



## बदलते तंत्रज्ञान

# पोळी बनवल्यावर एआय देणार तुम्हाला गुण!

आजच्या डिजिटल युगात जीमेल हा आपल्या जीवनाचाएक महत्त्वाचा भाग बनला आहे. सध्याचा काळ आर्टिफिशियल इंटेलिजन्सचा (एआय) आहे. एआयचा वापर जवळपास प्रत्येक क्षेत्रात केला जातो आहे. शिक्षण, नोकरी आणि आता स्वयंपाकघरातसुद्धा एआय हस्तक्षेप करण्यास सुरुवात करणार आहे. कारण- आता तुम्हाला



पोळी किती चांगली लाटता येते या तुमच्या कौशल्याला एआय गुण देणार आहे. अनेकदाआई किंवा होणारी सासू आपल्याला पोळ्या गोल लाटता यायला पाहिजेत, असे आवर्जून सांगते आणि त्याला नकळत त्यांच्या शब्दात गुण देते. तर हे कामआतएआय करणार आहे.बंगळुरूच्या आयटी खरगपूर येथील विद्यार्थ्याने रोटी चेकर. एआय नावाचे एआय टूल विकसित केले आहे. हे नवीन एआय टूल पोळीच्या गोलाकाराचे मूल्यांकन करण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्तेचा म्हणजेच एआयचा वापर करते आणि १०० पैकी तुमच्या पोळीला किती गुण मिळणार हे सांगते. एखाद्याच्या पोळी बनवण्याच्या कौशल्याचे मूल्यांकन करण्यासाठी हे एक मजेदार टूल आहे, असे म्हणायला हरकत नाही.एका युजरने अगदी अभिमानाने तिच्या गोलाकार रोटीचा फोटो शेअर केला आणि गोल पोळी बनवणेसुद्धा एक कला आहे (गोल रोटी बनाना भी एक आर्ट है) अशी कॅप्शन दिली. तर याच पोस्टपासून प्रेरित होऊन अनिमेश चौहान यांनी रोटी चेकर. एआय तयार केले. युजरने पोस्ट केलेल्या पोळीला एआय टूलने १०० पैकी ९१ गुण दिले आणि या टूलने पटकन लोकप्रियता मिळवली.

युजरने त्यांच्या लाटलेल्या पोळीचा फोटो रोटी चेकर . एआय वर अपलोड करायचा. त्यानंतर एआय पोळी किती गोल आहे याचे मूल्यांकन करते. त्यानंतर हे एआय टूल तुम्हाला १०० पैकी गुण देईल. तर अशा प्रकारे युजर्स त्यांच्या पोळी बनवण्याच्या कौशल्याचे मूल्यांकन करण्यासाठी एक मजेदार टूलची मदत घेऊ शकतात.

सोशल मीडियावर ही पोस्ट अमिनेश सिंघ ३८ या एक्स (ट्विटर) अकाउंटवरून शेअर करण्यात आली आहे. 'जर पोस्टला ४२० लाईक्स मिळाले, तर एआय लिंक सार्वजनिकरीत्या उपलब्ध करून देण्याचे आश्वासन अनिमेश चौहान यांनी कॅप्शनमध्ये दिले आहे.

# विदुषी दुर्गाबाई भागवत

दुर्गा भागवत या मराठी लेखिका होत्या. इंदूर येथे १० फेब्रुवारी १९१० साली त्यांचा जन्म झाला. वैविध्यपूर्ण साहित्यप्रकारात त्यांचे मोठे योगदान आहे. यांत लोकसाहित्य, बालसाहित्य, बौद्धसाहित्य, कथा, चरित्र, ललित, संशोधनपर, समीक्षात्मक, वैचारिक लेखन यांचा समावेश होतो. त्यांचा फ्रेंच, जर्मन, इंग्रजी, संस्कृत, पाली या भाषा चांगल्या अवगत होत्या. १९७५ साली इंदिरा गांधींनी देशावर लादलेल्या आणीबाणीला स्पष्ट विरोध करणाऱ्या म्हणून दुर्गाबाई विशेष मान्यता पावल्या होत्या. सुस्पष्ट प्रामाणिक विचार, छोटी छोटी वाक्ये, नादमय शब्द आणि अर्थातील सुबोधता हे दुर्गाबाईंच्या लेखनाचे वैशिष्ट्य होते. दुर्गाबाईंच्या लेखनात भारतातील सांस्कृतिक, पौराणिक, सामाजिक जीवनातले अनेक संदर्भ अभ्यासपूर्वक नोंदविलेले दिसतात. अभ्यास आणि लिखाण हे त्यांचे आस्थेचे विषय होते. म्हणूनच त्यांच्या लिखाणात संशोधन, विद्वत्ता आणि माहितीचा प्रचंड साठा या त्रयींचा अपूर्व संगम आढळतो.



## निमित्त


त्यांच्या लिखाणात स्पष्ट आणि प्रामाणिक विचारांबरोबरच कवी मनाची कोमलता आढळते. लोकसाहित्याच्या व्यासंगात बुडलेल्या दुर्गाबाईंच्या लेखनात लोकसाहित्याचा जिवंत रसरशीतपणा, मोहक साधेपणा, बोलभाषेची मांडणी आढळते, तसेच व्यासंग-चिंतन-मनन यांतून आलेले त्यांचे विचारही त्यांच्या साहित्यात दिसून येतात. दुर्गाबाईंच्या लेखनातील मौलिकता, अस्सल भारतीयत्व, सनातनत्व यांचा वेध घेण्याची शक्ती यांमुळे ललित निबंधाच्या क्षेत्रात त्यांनी एक नवा मानदंड निर्माण केला आहे.

मुंबईतील एशियाटिक सोसायटीच्या त्या क्रियाशील कार्यकर्त्या होत्या. संशोधन व साहित्य या क्षेत्रात रमणाऱ्या दुर्गाबाईंना पाककलेतही रुची होती. पाकशास्त्रात त्या पारंगत होत्या. त्यांनी काही नवीन पाककृतीही तयार केल्या आहेत. त्या विणकाम, भरतकामही उत्तम करत. दुर्गाबाई अविवाहित होत्या, घरातील कामात त्यांना विशेष आवड होती.

साने गुरूजींनी प्रेरीत केल्याने दुर्गाबाईं प्रथम ललितलेखनाकडे वळल्या. महानदीच्या तीरावर ही गोंडजीवनातील प्रेमकथा त्यांची पहिली ललितनिर्मिती. पुढे दीर्घ आजारपणातील बंदिस्त एकांत वासाने त्यांना नव्याने ललितलेखनाची प्रेरणा दिली. ऋतुचक्र या मराठीतील अपूर्व पुस्तकाचे लेखन त्यातून घडले. विविध ऋतूंतील निसर्गाच्या बदलत्या लावण्यविभ्रमांचे चित्रांकन करणाऱ्या या गद्यकाव्यात्म ललितनिबंधातून निसर्ग आणि मानव यांच्यातला गूढ ऋणानुबंध प्रतीत होतो.

आणिबाणीच्या काळात दुर्गाबाईंनी लेखन विचारस्वातंत्र्याचा जोरदार पुरस्कार केला व त्यासाठी कारावासही पत्करला. विद्वत्ता, ज्ञानसाधना, नवनिर्मिती यांचे अनुशासन नोकरशाहीच्या हाती असू नये व खऱ्या लोकशाहीची प्रतीमा सिद्ध करण्यास विचारवंतांनी प्रयत्नशील राहिले पाहिजे, अशी त्यांची भूमिका होती. कराड येथे भरलेल्या १९७५ सालच्या एक्कावन्नाव्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद त्यांनी भूषविले. मुंबई येथे वयाच्या ९२ व्या वर्षी त्यांचं निधन झालं. (साभार : इंटरनेट)

## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर

# सकाळी श्वासोच्छवासाच्या व्यायामाचे फायदे...

सकाळच्या वेळी मुलांना शाळेत सोडणे, घरातील जेवण बनवणे, ऑफिसला जाणे या सर्व कामांमध्ये बहुतेक लोकांसाठी सकाळची वेळ खूप घाई-गडबडीची असते. परंतु, त्यातूनही जर तुम्ही श्वासोच्छ्वासाच्या व्यायामासाठी थोडा वेळ काढला, तर ते तुमच्या आरोग्यासाठी अधिक फायदेशीर ठरू शकते, असं गॅरी ब्रेका म्हणाले. त्यांच्या



मते, श्वासोच्छ्वासाचे व्यायाम खूप फायदेशीर ठरू शकतात. विशेषतः सकाळी उठल्यानंतर पहिल्या ३० मिनिटांत. हे डोपामाइन वाढवते. ते तुमचा मूड, भावनिक स्थिती सुधारते. तुमचा डायफ्राम तुमच्या आतड्यांना मालिश करतो. त्याशिवाय तुमच्या रक्तात ऑक्सिजन भरला जातो. त्यामुळे दिवसभर तुम्हाला उत्साही वाटते.

त्यासाठी घराबाहेर जा. ३० वेळा श्वास घेण्याच्या तीन फेऱ्या करा आणि तीन सेटमध्ये श्वास रोखून ठेवा. झोपताना आपण सक्रियतेने खोलवर श्वास घेत नाही. म्हणून जेव्हा तुम्ही जागे झाल्यानंतर पहिल्या ३० मिनिटांत जाणीवपूर्वक दीर्घ श्वास घेता तेव्हा तो व्यायाम तुमच्या शरीर आणि मनासाठी चमत्कार ठरू शकतो, असे 'हबिल्ड'चे संस्थापक व प्रमाणित योग प्रशिक्षक सौरभ बोथरा म्हणाले. हा व्यायाम तुमच्या मज्जासंस्थेला शांत करण्यास मदत करतो.रक्त प्रवाहित करतो.योग्य ऑक्सिजनद्वारे तुमच्या शरीर आणि मेंदूला ऊर्जा मिळते.तुमच्या शरीरातील प्रत्येक पेशी पुनरुज्जीवित होते.

सकाळी उठल्यानंतर ३० मिनिटांच्या आत नाकाने श्वास घेण्याचा व्यायाम केल्याने तुमच्या शरीर आणि मनाला फायदा होऊ शकतो. नाकाने आरामशीर श्वास घेणे, नाकातून पर्यायी श्वास घेणे व पोटातून श्वास घेणे यांसारख्या तंत्रांमुळे तुमच्या दिवसाची सुरुवात शांत होते. नाकातून श्वास घेऊन आणि बाहेर टाकून, तुम्ही हवेला आर्द्रता देता, श्वसनाचा आराम वाढवता व फुप्फुसांच्या आरोग्याला चालना देता, असे डॉ. सिन्हा स्पष्ट केले.

झोपेतून उठल्यानंतर ३० मिनिटांच्या आत अनुनासिक किंवा नाकाच्या श्वसनाचा व्यायाम करणे महत्त्वाचे आहे. हा व्यायाम तुमच्या शरीरासाठी नैसर्गिक अलार्मप्रमाणे काम करतो. असे बोथरा यांनी सांगितले. स्थिती सुधारते. तुमचा डायफ्राम तुमच्या आतड्यांना मालिश करतो. त्याशिवाय तुमच्या रक्तात ऑक्सिजन भरला जातो. त्यामुळे दिवसभर तुम्हाला उत्साही वाटते.

# रायगड जिल्ह्यात झेडपी, पंचायत समितीचा संमिश्र निकाल

## महाडमध्ये मंत्री भरत गोगावले यांनी गड राखला

**महाड : प्रतिनिधी**

जाहीर झालेल्या जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या मतमोजणी मध्ये मंत्री भरत गोगावले यांचेच वर्चस्व असल्याचे पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे. जिल्हा परिषदेच्या पाचही गटामध्ये शिवसेनेचे उमेदवार निवडून आले असून पंचायत समितीच्या दहा पैकी नऊ जागांवर वर्चस्व सिद्ध केले आहे.

जिल्हा परिषद पाच आणि पंचायत समितीच्या दहा जागांसाठी झालेल्या निवडणुकांचा निकाल आज जाहीर करण्यात आला. महाड मधील डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय स्मारकामध्ये सकाळी दहा वाजता मतमोजणी साठी सुरवात झाली. जिल्हा परिषदेच्या पाच आणि पंचायत समितीच्या दहा जागांचा निकाल आज रोजी जाहीर करण्यात आला.

या मतमोजणी मध्ये सुरुवातीपासूनच शिवसेना शिंदे गटाचा बोलबाला दिसून आला. जिल्हा परिषदेच्या पाच आणि पंचायत समितीच्या सर्व उमेदवारांनी सकाळपासूनच आघाडी घेतली. त्यामुळे भाजप राष्ट्रवादी काँग्रेसच्या उमेदवारांनी पराभव मान्य करत निघून जाणे पसंत केले.

महाडमध्ये बिरवाडी जि.प. गटात मंदा भागोजी ढेबे, खरवली जिल्हा परिषद गट मनाली मनोज काळीजकर,



नडगाव तर्फे बिरवाडी जिल्हा परिषद गट विकास भरत गोगावले, दासगांव जि. प. गट मन्सूर अ. हमीद ताज, करंजाडी जि.प. गट निलेश लक्ष्मण ताठरे, हे विजयी झाले आहेत. तर पंचायत समिती वरंध पंचायत समिती गण नूतन गोपाळ मोरे, खरवली पंचायत समिती गण दिव्या मनोहर रेशीम, नडगाव तर्फे बिरवाडी पंचायत समिती गण रेणुका राजेश देशमुख, नाते पंचायत समिती गण सुरेश शांताराम महाडिक, दासगाव पंचायत समिती गण प्रेरणा जितेंद्र सावंत, करंजाडी पंचायत समिती गण पंचायत समिती गण संदीप रमेश खिडबडे, विन्हेरे पंचायत समिती गण शकुंतला श्रीरंग माने, अप्पर तुडील सबिया पाचकर, या विजयी उमेदवारांचा समावेश आहे. यातील सवाने पंचायत समिती गणातील अनिल जाधव हे यापूर्वी बिनविरोध जाहीर करण्यात आलेले आहेत. पंचायत समिती गणांमध्ये बिरवाडी पंचायत समिती गणामध्ये मयूर पुंडलिक जाधव याने विजयी होत राष्ट्रवादी भाजपचे एकमेव खाते खोलले आहे.

त्यामुळे महाड नगरपालिका निवडणुकीनंतर जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकीमध्ये शिवसेना शिंदे गटाने पुन्हा एकदा वर्चस्व सिद्ध केले आहे.

जिल्हा परिषद निवडणुकीमध्ये महाडमध्ये चुरशीच्या ठरल्या जाणाऱ्यांपैकी नडगाव तर्फे बिरवाडी जिल्हा परिषद गटात मंत्री भरत गोगावले यांची सुपुत्र विकास भरत गोगावले तर करंजाडी जिल्हा परिषद मतदार संघात सतत चर्चेत असलेले सोमनाथ ओझर्डे, आणि नव्याने करोडपतीच्या यादीत जाऊन बसलेले चेतन औकीरकर ही नावे चर्चेत होती.

विकास गोगावले याने नडगाव तर्फे बिरवाडी जिल्हा परिषद गटामध्ये पाच हजाराची आघाडी घेऊन राष्ट्रवादीचे तालुकाध्यक्ष निलेश महाडिक यांचा दारुण पराभव केला तर तिकडे जनसंपर्क असलेले निलेश ताठरे यांनी सोमनाथ ओझर्डे यांचा पराभव केला.

महाड नगर पालिका निवडणुकीत बऱ्यापैकी सदस्य निवडून आणल्यानंतर नंतर जिल्हा परिषद आणि पंचायत समिती ताब्यात घेण्यासाठी एकीकडे खा. सुनील तटकरे यांनी भाजप जवळ युती करत ताकत लावली. मात्र दांडगा जनसंपर्क असलेल्या मंत्री भरत गोगावले यांनी पुन्हा एकदा महाड पोलादपूर तालुक्यावर पकड मजबूत असल्याचे दाखवून दिले.

## म्हसळा तालुक्यात राष्ट्रवादीचा बोलबाला

### जिल्हा परिषदेच्या दोन आणि पंचायत समितीच्या चारही जागांवर मिळविले निर्विवाद वर्चस्व

**म्हसळा : रामप्रहर वृत्त**

जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या सार्वत्रिक निवडणुकीत म्हसळा तालुक्यात राष्ट्रवादी काँग्रेसने निर्विवाद वर्चस्व सिद्ध करत घड्याळाचा दणदणीत गजर केला आहे. जिल्हा परिषदेच्या दोन आणि पंचायत समितीच्या चारही जागांवर राष्ट्रवादी काँग्रेसच्या उमेदवारांनी मोठ्या मताधिक्याने विजय मिळवत विरोधकांना जोरदार धक्का दिला आहे.

पाभरे जिल्हा परिषद गटातून राष्ट्रवादी काँग्रेसचे उमेदवार अनिल रामचंद्र बसवत यांनी एकूण ५,९९३ मते मिळवत शेकापचे संतोष पाटील (२,८८४ मते) व शिवसेना शिंदे गटाचे अकमल कादरी (२,६४८ मते) यांचा पराभव केला. अनिल बसवत यांनी तब्बल ३,१०९ मताधिक्याने विजय मिळवला.

पांगलोळी जिल्हा परिषद गटात राष्ट्रवादी काँग्रेसचे अभिषेक भास्कर विचारे यांनी ६,३२२ मते घेत शिवसेना शिंदे गटाचे प्रसाद बोर्ले (२,५६७ मते) व उबाठाचे रोशन पारावे (१,४४८ मते) यांना मागे टाकत ३,७५५ मताधिक्याने दणदणीत विजय संपादन केला.

पंचायत समिती निवडणुकांमध्येही राष्ट्रवादी काँग्रेसने एकहाती सत्ता मिळवली आहे. पाभरे पंचायत समिती गणात राष्ट्रवादी काँग्रेसच्या समृध्दी संदीप चाचले यांनी ३,०७८ मते मिळवत शेकापच्या ज्योती गीजे (१,४४३) व शिवसेना शिंदे गटाच्या अमिता जाधव (१,२५८) यांचा पराभव करत १,६३५ मताधिक्याने विजय मिळवला.

खरसई पंचायत समिती गणातून राष्ट्रवादी काँग्रेसचे लहू अंबाजी म्हात्रे यांनी २,७७८ मते घेत शिवसेना शिंदे गटाचे महेश पाटील (१,६६८) व उबाठाचे रमेश खोत (१,२२०) यांचा पराभव करत १,११० मताधिक्याने विजय मिळवला.


साळविंडे पंचायत समिती गणात राष्ट्रवादी काँग्रेसचे बबन श्रीपत मनवे यांनी ३,४१३ मते मिळवत शिवसेना शिंदे गटाचे अमोल पेंढारी (१,५९२) व उबाठाचे बाळकृष्ण म्हात्रे (७०७) यांचा पराभव करत १,८२१ मताधिक्याने विजय संपादन केला.पांगलोळी पंचायत समिती गणातून राष्ट्रवादी काँग्रेसच्या प्रियंका प्रसन्न निंबरे यांनी ३,१३१ मते मिळवत शिवसेना शिंदे गटाच्या रिया पाटेकर (९४९) व उबाठाचे चैतन्या गजमल (७३१) यांचा पराभव करत २,१८२ मताधिक्याने विजय मिळवला. या निकालांमुळे म्हसळा तालुक्यात राष्ट्रवादी काँग्रेसची ताकद पुन्हा एकदा अधोरेखित झाली असून कार्यकर्त्यांमध्ये मोठ्या प्रमाणात उत्साहाचे वातावरण आहे. विजय मिळाल्यानंतर ठिकठिकाणी जल्लोष करत घड्याळाच्या गजरात कार्यकर्त्यांनी आनंद साजरा केला.

## खालापुरात महायुतीची सरशी; राष्ट्रवादी, 'उबाठा'ला दे धक्का!

**खोपोली:प्रतिनिधी**

जिल्हा परिषद पंचायत समिती निवडणुकीच्या निकालात खालापूर तालुक्यात राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (अजित पवार ) मोठा धक्का बसला आहे. जिल्हा परिषदेच्या चार पैकी एक केवळ जागा आणि पंचायत समितीच्या केवळ दोन जागांवर विजय मिळाला आहे .चौक जिल्हा परिषद गट आणि पंचायत समितीच्या दोन जागा जिंकत तर उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेने कमबॅक केले आहे. चौक गटात भाजपा पराभवचा धक्का दिला आहे. जिल्हा परिषदेच्या चार जागांपैकी वासांबे गटातून भाजपाच्या नेहा भूषण पारंगे यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अजित पवार गटाचे संदीप मुंडे यांचा पराभव केला.

आत्करगाव जिल्हा परिषद गटात पंचायत समिती खालापूरच्या माजी सभापती राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाच्या श्रद्धा साखरे यांचा शिंदे शिवसेनेच्या रेश्मा राजू पाटील यांनी पराभव केला. सावरोली जिल्हा परिषद गट राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवारने स्वतःकडे राखताना या ठिकाणी शिंदे शिवसेना गटाचे



ज्ञानेश्वर गायकवाड यांचा पराभव केला. याठिकाणी आमदार महेंद्र थोरवे यांची प्रतिष्ठा पणाला लागली होती. चौक जिल्हा परिषद गटात भाजपाला मोठा पराभव सहन करावा लागला आहे .या ठिकाणी भाजपाच्या ठोंबरे बंधूंचं वर्चस्व असताना उबाठा सेनेच्या कट्टर शिवसैनिकांनी विजयश्री खेचून आणली .चौक जिल्हा परिषद गटात उबाठा सेनेच्या वैशाली विष्णू खैर यांनी भाजपाच्या संगीता विजय निरगुडा यांचा मोठ्या फरकाने पराभव केला.

पंचायत समिती महायुतीने ताब्यात घेत २०१७ ला झालेल्या पराभवाची परतफेड केली आहे. भारतीय जनता पार्टीला प्रथमच सर्वाधिक तीन जागा मिळाल्या असून दोन जागा शिंदे शिवसेना, दोन जागा उद्धव बाळासाहेब ठाकरे सेना आणि एक जागा राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाला मिळाली आहे.

**जिल्हा परिषद निकाल**

**चौक जिल्हा परिषद गट**

१) वैशाली विष्णू खैर – विजयी (उबाठा सेना)

२) संगीता विजय निरगुडा – पराभूत (भाजपा)

**वासांबे जिल्हा परिषद गट–**

१) नेहा भुषण पारंगे – विजयी (भाजपा)

२) मुंडे संदिप सुदाम –पराभूत (राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट)

सावरोली जिल्हा परिषद गट–

१) बैलमारे संतोष गणेश–विजयी (राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट)

२) गायकवाड ज्ञानेश्वर भानुदास– पराभूत (शिंदे शिवसेना)

**आत्करगाव जिल्हा परिषद गट**

१) रेश्मा राजेश पाटील –विजयी (शिंदे शिवसेना)

२)श्रद्धा अंकित साखरे– पराभूत (राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट)

**पंचायत समिती गणातील विजयी उमेदवार –**

खानाव गण

१) भाई रघुनाथ शिंदे– विजयी (शिंदे शिवसेना )

२) भूषण सूर्यकांत पाटील– पराभूत (राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट)

आत्करगाव पंचायत समिती गण–

१) देवयानी अजित देशमुख–विजयी (राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट)

२) रोहिणी गणेश येरम – पराभूत (शिंदे शिवसेना)

**वाशिवली पंचायत समिती गण**

१) गौरी महादेव गडगे – विजयी (भाजपा )

२) पुनम विलास म्हात्रे –पराभूत (उद्धव बाळासाहेब ठाकरे सेना)

सावरोली पंचायत समिती गण–

१) प्रमिला महेश पाटील – विजयी (उबाठा सेना)

२) माधुरी संदेश पाटील – पराभूत (शिंदे शिवसेना)

वासांबे पंचायत समिती गण

१) अर्चना आत्माराम भोईर विजयी –(भाजपा)

२) रोशन बाळाराम राऊत – पराभूत –(उबाठा सेना)

रिस पंचायती समिती गण

१) कृष्णा गंगाराम पारंगे –विजयी (भाजपा)

२), ढवळे निखिल नरेंद्र – पराभूत (काँग्रेस)

चौक पंचायती समिती गण

१) कमल राम भस्मा– विजयी (उबाठा सेना )

२) अरुणा रमेश पारधी –पराभूत (भाजपा)

हाळखुर्द पंचायती समिती गण

१) रितेश बळीराम जाधव –विजयी (शिंदे शिवसेना)

२) लक्ष्मण सुदाम वाघमारे– पराभूत (राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट)

## अपघातात दुचाकीस्वार जखमी

**माणगाव : रामप्रहर वृत्त**

माणगाव पोलीस ठाणे हद्दीत रविवारी मौजे विळे गावचे हद्दीत एचपी गॅस गोडाउन समोरील रोडवर मोटारसायकल अतिवेगाने रस्त्याचे परस्थितीकडे दुर्लक्ष करुन चालवीत असताना चालकाचा मोटारसायकल वरील ताबा सुटुन मोटार सायकल रोडचे खाली झुडपात जावुन अपघात झाला. याबाबत माणगाव पोलीस ठाणेत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.


### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळवीणेत येते की मौजे भेरले, तहसील – पनवेल, जिल्हा – रायगड, येथील खाली वर्णन करणेत आलेली शेतजमीन विद्यमान कब्जेदार श्री. धनाजी धर्मा पाटील व श्री. रामदास धर्मा पाटील, यांचेकडून आमचे अशिलानी कायम खरेदी घेणेचा व्यवहार ठरविला आहे, महसूल दप्तरी असलेले सदर शेतजमीनीचे वर्णन खालिलप्रमाणे :

**शेतजमीनीचे वर्णन**

मौजे भेरले, तहसील पनवेल जिल्हा रायगड येथील मे. दुय्यम निबंधक पनवेल यांचे अधीकार क्षेत्रातील.

| गट क्रमांक व उपविभाग | भोगवटादार वर्ग | क्षेत्र लावणी लायक हे.आर.प्रती | क्षेत्र पोटखराबा हे.आर.प्रती | क्षेत्र एकुण क्षेत्र हे.आर.प्रती | आकार रू.पै. |
|---|---|---|---|---|---|
| १३४ | १ | ०–३९–०० | ०–१८–७० | ०–५७–७० | १.८१ |

वरील शेतजमीन / मिळकत या बाबत अन्य कोणाही व्यक्तीचा गहाण, दान, बक्षीस, साठेकरार, फरोक्त, पोटगी, वारसा वा तत्सम कोणतेही प्रकारचे दस्ताने कोणतेही प्रकारचा हक्क वा हितसंबंध असल्यास त्यांनी आपल्या लेखी हरकती प्रथम दर्शनी पुराव्यासहीत सदर नोटीस प्रसिध्द झालेपासुन १५ दिवसाचे आत पोहचतील अश्या खाली सही करणार खरेदीदाराचे वकील यांचेकडे रजिस्टर्ड पोस्टाने पाठवाव्यात. वरील मुदतीत हरकती न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहित आहे असे समजणेत येवुन सदर खरेदी व्यवहार विद्यमान मालक यांच्या बरोबर पूर्ण केला जाईल व मुदतीनंतर आलेल्या हरकती आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची स्पष्ट नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल
दिनांक : ०९/०२/२०२६

सही/–
**ॲड. स्वप्निल व्यं. जाधव**
बी.ए., एल. एल. बी.
(खरेदीदाराचे वकील)

**कार्यालयीन पत्ता** – शॉप नं. १५४, पनवेल महानगरपालिका शॉपिंग कॉम्प्लेक्स, दत्त झेरॉक्सच्यावर, ता. पनवेल, जिल्हा रायगड ४१०२०६


## खोपोलीत चिन्मय अमृत यात्रा उत्साहात

**खालापूर : प्रतिनिधी**

चिन्मय मिशन खोपोलीच्या ७५ व्या वर्धापन दिनानिमित्त चिन्मय अमृत यात्रा अंतर्गत प.पू. स्वामी चिन्मयानंदजी महाराजांच्या पादुकांची भव्य रथयात्रा व पूजन सोहळा मोठ्या उत्साहात संपन्न झाला. या कार्यक्रमाचे आयोजन चिन्मय मिशन खोपोलीचे स्वामी मेधजानंदजी व कार्यकारिणी समिती यांच्या वतीने करण्यात आले होते.

मिरवणुकीदरम्यान मार्गावरील प्रत्येक घरासमोर रांगोळ्या काढून सुहासिनी माता–भगिनींनी प.पू. स्वामी चिन्मयानंदजींच्या पादुकांचे मनोभावे पूजन व औक्षण केले. या यात्रेत वारकरी भाविकांसह विश्व हिंदू परिषद, बजरंग दल, भाजपा आध्यात्मिक समन्वय आघाडी, ब्राह्मण सभा कार्यकारिणी तसेच समाजातील विविध क्षेत्रांतील मान्यवरांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला.

या प्रसंगी वारकरी संप्रदायाचे ज्येष्ठ कीर्तनकार ह.भ.प. श्री. चैतन्य महाराज खंडागले, ह.भ.प. श्री. काशिनाथ महाराज लबडे, ह.भ.प. श्री. अशोक महाराज जाधव, ह.भ.प. श्री. प्रभाकर महाराज सालेकर आदी महाराज मंडळींची उपस्थिती लाभली. तसेच भाजपा आध्यात्मिक समन्वय आघाडी रायगड जिल्हा संयोजक ह.भ.प. काशिनाथजी पारठे, विश्व हिंदू परिषदचे भावेश लोखंडे, रूपेश मिस्त्रीखोपोली नगर परिषदेचे नगराध्यक्ष कुलदीपक शेंडे, नगरसेवक व नगरसेवीका यांचीही उपस्थिती होती.



## शौर्यम वॉकेथॉनला कमांडोजसह नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद



**खालापूर : प्रतिनिधी**

शौर्यम वॉकेथॉन 'ला कमांडोज आणि नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद : मार्कोस वेटरन फाँडेशनतर्फे 'गौरवाच्या पाऊलखुणा' या थीमवर आधारित शौर्यम वॉकेथॉन खारघर येथे आठ फेब्रुवारी रोजी सकाळी ७ वाजता आयोजित करण्यात आली होती.

या वोकेथॉन मध्ये भारतीय नौदलाच्या सेवेत असलेल्या INS ABHIMANYU येथील मरीन कमांडोज सहित निवृत्त मरीन कमांडोज, NSG कमांडोज, माजी सैनिक, महाराष्ट्र पोलीस दलातील कर्मचारी तसेच नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. मरीन कमांडोज हे जगातील सर्वात श्रेष्ठ कमांडोज मानले जातात. शौर्यम वॉकेथॉनमध्ये सर्व सामान्य नागरिकांना सेवेत असलेल्या तसेच निवृत्त मरीन कमांडोज सोबत चालण्याची आणि संवाद साधण्याची संधी मिळाली. नागरिकांच्या कमांडोज विषयी असणाऱ्या आकर्षणामुळे या स्पर्धेला विशेष महत्व प्राप्त झाले होते.

लहान मुलांनी आणि इतर स्पर्धकांनी कमांडोज सोबत संवाद साधत त्यांच्या बरोबर फोटोही काढून घेतले.


### पेण नगरपरिषद, पेण

जिल्हा – रायगड

कार्यालय : ०२१४३–२५२०२३ अध्यक्ष कार्यालय : ०२१४३–२५२०६३
मुख्याधिकारी : ०२१४३–२५२८२४ फॅक्स: ०२१४३–२५२१८३
Email : copenmc@gmail.com

**जाहीर निविदा**

पेण नगरपरिषदेतर्फे १९ फेब्रुवारी २०२६ रोजी छत्रपती श्री शिवाजी महाराज यांची जयंती साजरी करावयाची आहे. त्या अनुषंगाने खालील नुसार निविदा प्रसिद्ध करण्यात येत आहे.

१. पेण नगरपरिषद छत्रपती शिवाजी महाराज मेघडंबरीचे सुशोभिकरण करणे. (झालर व पडदे लावण्यात यावे.)
२. विद्युत रोषणाई करणे
३. स्पिकर सेट बसविणे

सदरची निविदा दोन बंद लिफाफ्यात देण्यात यावी. याकामी **५० रु फॉर्म फि** असुन फॉर्म फि सोबत **५०० रु. इसारा रक्कम** भरण्यात यावी. निविदा चा कालावधी **१०/०२/२०२६ ते १७/०२/२०२६** हा आहे. यानुसार निविदा सादर करण्यात यावी. निविदेची फॉर्म फि व इसारा रक्कम **दि. १६/०२/२०२६** रोजीपर्यंत लेखा विभागाकडे भरणा करावे. निविदा भरण्याची अंतिम **तारीख १७/०२/२०२६** या तारखेपर्यंत वेळ ४.०० वाजेपर्यंत राहील. निविदेच्या अटी व शर्ती या निविदा फॉर्म वर नमुद आहेत.

दिनांक : ९/०२/२०२६
जा.क्र.पेनप/का–१/सा.प्र./२०२६/

सही/–
**मुख्याधिकारी**
पेण नगरपरिषद पेण



**MAHATRANSCO**
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**E-TENDER NOTICE**

MSETCL invites online bids (e-Tender) from reputed and registered contractors on Mahatransco e-Tendering Website **https://srmetender.mahatransco.in/** for the following Tender specification

| Sr. No. | Tender No.EE/400kV R.S. (O&M) Dn/ NGTN/Tech/ | Description | Estimated cost in lakhs | Submission date |
|---|---|---|---|---|
| 1 | e-Tender-17/25-26/ Rfx No.7000038817 | Supply of Silica Gel Breather for various ICT/ TF unit at 400 kV Nagothane s/s under 400 kV R.S. O&M Div. Nagothane. | Rs. 3,35,272.27/- | 24.02.2026 up to 23.59 hrs |

**EMD** Rs. 5000/-, **Tender fee** Rs. 500/- + GST For further details visit our website **https://srmetender.mahatransco.in/**

**Contact Person:** Mitesh Goyal (Dy. EE) Mob No. 9461456635 **Email ID: ee7230@mahatransco.in**

**Note:** All eligible suppliers / Contractors are mandated to get enrolled on SRM E Tenders (New) portal of MSETCL.

**Sd/-**
**EXECUTIVE ENGINEER**
**400kV R.S. (O&M) Dn. Nagothane.**



### जाहीर सूचना

तमाम जनतेला कळविण्यात येते की, माझे अशील श्री. दिगंबर भागुराम वाघमारे (रा. मु. अरिवली, पो. अजिवली, ता. पनवेल, जि. रायगड ४१०२२१) यांचे ताब्यातुन, त्यांचेमध्ये व श्री. शांताराम नारायण पाटील यांचेमध्ये मौजे अरिवली, ता. पनवेल, जि. रायगड येथील गट क्र. १३५/०, याचे एकूण क्षेत्रापैकीचे ६०० वार क्षेत्र असलेल्या जमीन मिळकतीबाबत दिनांक ०३/०६/१९७८ रोजी झालेला, नोंदणीकृत नसलेला करारनामा मुळ दस्त हरवीलेला / गहाळ झालेला आहे. आजरोजी सदर दस्ताचा काळजीपुर्वक व सखोल शोध घेतला असता सुद्धा सदरचा मूळ करारनामा माझे अशीलांना सापडलेला नाही. त्याबाबत माझे अशीलांनी पनवेल तालुका पोलिस स्टेशन, नवी मुंबई येथे दिनांक ८/०२/२०२६ रोजी गहाळ वस्तु रजिस्टर क्र. ५१/२०२६ अन्वये तक्रार नोंदवीली आहे.

सदर गहाळ झालेल्या कागदपत्राच्या व वर उल्लेखीत मिळकतीच्या अनुशंगाने कोणास काही माहीती असल्यास अथवा कोणाचीही हरकत, दावा, तक्रार, तारण, गहाण, दान, बोजा, पोटगी वा अन्य कोणताही हक्क हितसंबंध असल्यास, त्या व्यक्तीनी ही नोटीस प्रसिध्द झाल्याचे दिनांकापासून १४ दिवसांचे आत खालील सही करणार वकील यांजकडे लेखी हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासह दाखल कराव्यात, तशा प्रकारच्या हरकती दाखल न केल्या गेल्यास व मागाहून येणाऱ्या हरकती हया जाणीवपुर्वक सोडून दिल्या आहेत असे गृहीत धरुन, तसा गहाळ कागदपत्राचा व त्यातील उल्लेखीत मिळकतीच्या निर्वेधतेचा दाखला खाली सही करणार वकील देतील याची नोंद घ्यावी.

नवी मुंबई
दि.०८/०२/२०२६

सही/–
**ॲड. ज्ञानेश्वर मो. बऱ्हाटे**
राधा–कृष्ण निवास, प्लॉट क्र.३६८,
सेक्टर १, नेरूळ, नवी मुंबई ४००७०६
मो.क्र. ८०८२०२०३१५

# वॉर्डबॉयच्या हलगर्जीपणामुळे तरुणीचा मृत्यू

## डॉक्टर असल्याचे भासवून दिले इंजेक्शन

## मानखुर्द येथील आरोपी अटकेत

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

वैद्यकीय पात्रता नसतानाही स्वतःला डॉक्टर म्हणून सादर करून उपचार करणाऱ्या एका वॉर्डबॉयच्या हलगर्जीपणामुळे २१ वर्षीय तरुणीचा मृत्यू झाल्याची घटना ५ फेब्रुवारी रोजी वाशी येथे घडली. प्रचिती भिकुराम भुवड (वय २१) असे मृत तरुणीचे नाव असून या प्रकरणी संदेश पाष्टे (वय ३०, रा. मानखुर्द) याला पोलिसांनी अटक केली आहे. या घटनेमुळे शहरात सुरू असलेल्या अनधिकृत उपचारपद्धतींबाबत गंभीर प्रश्न निर्माण झाले आहेत.

पोलीस तपासानुसार संदेश पाष्टे हा अंधेरी येथील एका खासगी नर्सिंग होममध्ये वॉर्डबॉय म्हणून कार्यरत आहे, मात्र मानखुर्द व परिसरात तो स्वतःला डॉक्टर म्हणून सादर करत रुग्णांवर उपचार करत असल्याचे उघड झाले आहे. कोणतीही वैद्यकीय पदवी अथवा अधिकृत नोंदणी नसतानाही तो इंजेक्शन्स देत असल्याची बाब तपासात समोर आली आहे.

प्रचिती भुवड ही वाशी येथे कुटुंबासह राहत होती. तिला हार्मोनल आजार असल्याने उपचारासाठी कुटुंबियांनी ओळखीच्या माध्यमातून संदेश पाष्टेला घरी बोलावले. ५ फेब्रुवारी रोजी पाष्टेने तिची तपासणी करून एक इंजेक्शन दिले. त्यानंतर काही वेळातच प्रचितीची प्रकृती बिघडली. त्रास वाढत असल्याचे लक्षात येताच कोणताही तज्ज्ञ सल्ला न घेता पाष्टेने दुसरे इंजेक्शन दिले, मात्र यानंतर तिची अवस्था अधिक गंभीर झाली आणि काही वेळातच तिचा मृत्यू झाला.



> आरोपी डॉक्टर नसतानाही उपचार करत असल्याचे स्पष्ट झाले आहे. नागरिकांनी उपचार घेताना संबंधित व्यक्तीची वैद्यकीय पात्रता आणि नोंदणी तपासणे आवश्यक आहे. बनावट डॉक्टरांविरोधात कठोर कारवाई केली जाईल.
>
> **–शशिकांत चांदेकर, वरिष्ठ पोलीस निरीक्षक**

मुलीचा अचानक मृत्यू झाल्याने कुटुंबियांना संशय आला. प्रचितीचे वडील भिकुराम भुवड यांनी वाशी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. त्यानुसार पोलिसांनी तपास सुरू करून ६ फेब्रुवारी रोजी आरोपीला अटक केली. तपासात आणखी धक्कादायक माहिती समोर आली आहे.

आरोपीने प्रचितीच्या उपचारासाठी १५ हजार रुपये घेतल्याचे निष्पन्न झाले आहे. संबंधित आजारावरील उपचारासाठी साधारणपणे कमी शुल्क आकारले जाते, मात्र डॉक्टर असल्याचे भासवून मोठी रक्कम घेतल्याचे पोलिसांचे म्हणणे आहे. प्रचितीला नेमकी कोणती इंजेक्शन्स देण्यात आली, ती औषधे कायदेशीर होती का, तसेच डोस चुकीचा होता का, याबाबत सखोल तपास सुरू आहे. शवविच्छेदन अहवाल आल्यानंतर मृत्यूचे नेमके कारण स्पष्ट होणार आहे. या घटनेमुळे नवी मुंबई व मुंबई परिसरात सुरू असलेल्या बोगस डॉक्टरांच्या प्रकारांबाबत पुन्हा एकदा गंभीर इशारा मिळाला असून नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

# महापालिका प्रशासन नागरिक केंद्रित व पारदर्शी करण्याची मागणी

## सजग नागरिक मंचचे लोकप्रतिनिधींना पत्र

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई महानगरपालिकेच्या नवनियुक्त महापौर, उपमहापौर आणि सर्वपक्षीय नगरसेवकांनी पदभार स्वीकारताच 'सजग नागरिक मंच, नवी मुंबई'च्या वतीने त्यांना एक सविस्तर खुले पत्र पाठवण्यात आले आहे. शहराचा कारभार हा केवळ प्रशासन किंवा लोकप्रतिनिधी केंद्रित न राहता तो 'नागरिक केंद्रित' असावा, अशी आग्रही मागणी या पत्राद्वारे करण्यात आली आहे. संविधानाच्या ७४ व्या घटनादुरुस्तीचा आत्मा जोपासत पारदर्शक आणि उत्तरदायी प्रशासनासाठी तातडीने पावले उचलण्याचे आवाहन मंचाने केले आहे.

शहरातील लोकशाही बळकट करण्यासाठी प्रभाग सभा हा नागरिकांचा संविधानिक अधिकार आहे, मात्र नवी मुंबईत मतदारांच्या या मूलभूत अधिकाराला तिलांजली दिली असल्याचे दिसून येते आहे. प्रत्येक नगरसेवकाने आपल्या प्रभागात दर ३ ते ६ महिन्यांनी 'क्षेत्र सभा' आयोजित करून थेट नागरिक संवाद साधला पाहिजे, अशी सजग नागरिक मंचाची मागणी आहे. विकासकामांची निवड करताना नागरिकांचा सहभाग शून्य असून, तो वाढवण्यासाठी प्रस्तावित कामांची यादी प्रभाग सभेत मांडून त्यांची मान्यता घेणे आवश्यक असल्याचे मंचने म्हटले आहे.

### महासभेचे थेट प्रक्षेपण करा!

प्रशासनात पारदर्शकता आणण्यासाठी माहिती अधिकाराची प्रभावी अंमलबजावणी व्हावी. पालिकेचा 'वार्षिक प्रशासन अहवाल' जनतेसाठी खुला करावा. तसेच महापालिकेच्या सर्व सभांचे आणि महासभेचे कामकाज नागरिकांना घरबसल्या पाहता यावे, यासाठी त्याचे थेट प्रक्षेपण (Live Streaming) पब्लिक डोमेनवर करण्यात यावे, अशी महत्त्वपूर्ण मागणी करण्यात आली आहे.

> *महानगरपालिकेच्या प्रचार रणधुमाळीत मनपा कारभाराबाबत भ्रष्टाचाराचे आरोप करणाऱ्या सर्वपक्षीय लोकप्रतिनिधी व नगरसेवकांनी प्रशासकीय राजवटीतील पाच वर्षांच्या कारभाराचा संपूर्ण लेखाजोखा पब्लिक डोमेनवर उपलब्ध करून आपल्या आश्वासनाची व प्रामाणिकतेची वचनपूर्ती करावी.*
>
> **–संदीप ठाकूर,** प्रशासकीय सल्लागार, सजग नागरिक मंच, नवी मुंबई

प्रशासकीय राजवटीत झालेल्या कामांच्या पारदर्शकतेवर मंचाने प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. कोरोना कालावधीत तात्पुरत्या रुग्णालयांची निर्मिती आणि वस्तूंच्या खरेदीत मोठ्या प्रमाणावर निधीचा अपहार झाल्याचा संशय व्यक्त करण्यात आला आहे. या संपूर्ण खर्चावर तातडीने श्वेतपत्रिका काढण्यात यावी. तसेच मालमत्ता सर्वेक्षण (लीडार) आणि सांडपाणी पुनर्प्रक्रिया प्रकल्पांच्या खर्चाचे ऑडिट करून त्याचा अहवाल सार्वजनिक करावा, असेही पत्रात नमूद केले आहे.

केवळ रस्ते, गटार आणि फूटपाथ बांधणे म्हणजे विकास नसून शहराचा 'आर्थिक विकास' आणि 'सामाजिक न्याय' आराखडा तयार करणे अनिवार्य आहे. शहरामध्ये जुन्या इमारतींचा पुनर्विकास करताना व एफएसआय वाढवताना भविष्यातील लोकसंख्येला पुरेल इतके पाणी आणि आरोग्य सुविधा उपलब्ध आहेत का? याचा विचार होणे गरजेचे आहे. महापालिकेच्या शाळा आणि दवाखाने खासगी संस्थांच्या तोडीस तोड असावेत, जेणेकरून सामान्यांना दर्जेदार सेवा मिळेल.शहरातील टेकड्या आणि मोकळ्या जागांचे संरक्षण करण्यासाठी नागरिकांचा सहभाग असलेली समिती स्थापन करण्याची सजग नागरिक मंचची मागणी आहे.

# कराटे बेल्ट टेस्ट २०२६ उत्साहात

## किंग मार्शल आर्ट्स अकॅडमी अँड स्पोर्ट्सचा उपक्रम



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

खांदा कॉलनी येथील आग्री शिक्षण संस्था, सेक्टर ६, खांदा कॉलनी येथे किंग मार्शल आर्ट्स अकॅडमी अँड स्पोर्ट्स यांच्या वतीने ८ फेब्रुवारी रोजी कराटे बेल्ट टेस्ट २०२६ कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाला विद्यार्थ्यांबरोबरच पालकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

या कार्यक्रमात एकूण १५० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला, तर सुमारे २०० पालकांची उपस्थिती लाभली. विद्यार्थ्यांनी पाहुण्यांसमोर कराटे प्रात्यक्षिके (डेमॉन्स्ट्रेशन) सादर करत आपली शिस्त, आत्मविश्वास व कौशल्य यांचे प्रभावी दर्शन घडवले.

कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या म्हणून स्मिता ढाकणे (वरिष्ठ पोलीस निरीक्षक खांदेश्वर पोलीस स्टेशन) तसेच डॉ. श्रुती जाधव (प्राचार्य, गोखले एज्युकेशन सोसायटी लॉ कॉलेज, खारघर) उपस्थित होत्या. तसेच मराठी अभिनेत्री समृद्धी म्हात्रे आणि रायगड सम्राट न्यूजचे संपादक शंकर वायदंडे यांनी विशेष उपस्थिती लावली.

या कार्यक्रमाचे मुख्य प्रशिक्षक म्हणून संजय गमरे यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी प्रतीक्षा शेरकर, श्रेयस गमरे, यश वारके, हर्षद चंदनशिवे, श्रुती बोने, काजल मंडल या प्रशिक्षकांचे मोलाचे सहकार्य लाभले.

कार्यक्रमाचे आयोजन किंग मार्शल आर्ट्स अकॅडमी अँड स्पोर्ट्सचे अध्यक्ष स्वप्नील वारंगे (NIS) यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. त्यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करत, कराटेमुळे शिस्त, आत्मसंरक्षण व आत्मविश्वास वाढतो, असे प्रतिपादन केले. कार्यक्रमाच्या शेवटी यशस्वी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रे प्रदान करण्यात आली. संपूर्ण कार्यक्रम अत्यंत शिस्तबद्ध व उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

# विश्वधर्मी विश्वनाथ सभागृहाचे उद्या उद्घाटन

**नवी मुंबई :** एमआयटी विश्वशांती गुरुकुल स्कूल, उलवेमध्ये नव्याने उभारण्यात आलेल्या विश्वधर्मी विश्वनाथ सभागृहाचे उद्घाटन बुधवार, ११ फेब्रुवारी रोजी सकाळी १० वाजता होणार आहे. माईर्स एमआयटी शिक्षण समूहाचे अध्यक्ष डॉ. विश्वनाथ कराड आणि उषा कराड यांच्या मार्गदर्शनाखाली प्रमुख पाहुणे पद्मश्री परशुराम गंगावणे आणि माईर्स एमआयटीच्या विश्वस्त व महासचिव प्रा. स्वाती कराड चाटे यांच्या हस्ते उद्घाटन सोहळा होणार आहे.

ज्ञान, संस्कृती आणि भारतीय मूल्यांचे संवर्धनासाठी उभारण्यात आलेले नवी मुंबईतील उलवे येथील हे सभागृह शिक्षण, कला व सांस्कृतिक उपक्रमांसाठी सर्व सुविधांनी सुसज्ज आहे. शिक्षणाबरोबरच विद्यार्थ्यांमध्ये कलागुण विकसित करण्याचा दृष्टीने व त्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना देण्यात हे सभागृह महत्त्वपूर्ण भूमिका बजावेल.

# गरजूंच्या आर्थिक मदतीसाठी क्रिकेट स्पर्धा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

ग्रेस फुल ट्रस्ट ही गरजूंच्या मदतीसाठी सतत पुढाकार घेत असते. ह्या अगोदर ग्रेस फुल हॅन्ड ट्रस्टने अनेक सामाजिक उपक्रम राबविलेले आहेत. ह्याच सामाजिक कार्याच्या शृंखलेतून ग्रेस फुल हॅन्ड ट्रस्टने गरजूना आर्थिक मदतीसाठी महिलांची क्रिकेट स्पर्धा कर्नाळा स्पोर्ट्स पनवेल येथे आयोजित केली होती. ह्यावेळी गरजू विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी उर्वी अमित रॉय आणि तनिषा अमित रॉय याना ग्रेस फुल हॅन्ड ट्रस्ट तर्फे आर्थिक मदत देण्यात आली असे ट्रस्टच्या सर्वेसर्वा प्रो.पायल मधोक यांनी सांगितले.



या वेळी सहा महिलांच्या चमूने सहभाग घेतला होता. ह्या चमूच्या मयुरी सोळंकी, पूनम पाटील, भावना दास, सुमा ललित, उर्मिला जोशी आणि सुजाता शेलार कप्तान होत्या. या वेळी पनवेल महानगरपालिकेच्या नवनिर्वाचित नगरसेवक मा. प्रीती जॉर्ज, विशेष कार्यकारी अधिकारी अरविंद मोरे, ॲड. मनोहर पी. सचदेव, आणि योगा ट्रेनर मेघा इंगळे आदी मान्यवर उपस्थित होते.

या स्पर्धेत पनवेल लीगल वोररियर्स संघ विजेता ठरला तर गोदरेज टायटन संघ हा उप विजेता राहिला. या स्पर्धेत बेस्ट कॅप्टन मयुरी निखिल सोळंकी, बेस्ट बॅस्टमन सृष्टी सिंग, बेस्ट बॉलर सुजाता शेलार आणि बेस्ट ऑल राउंडर भावना दास यांनी पुरस्कार पटकाविला.

क्रिकेट स्पर्धेची सुरुवात उर्जावान वॉर्म अप ने मेघा इंगळे योगा ट्रेनर यांच्या द्वारे करण्यात आली त्यामुळे महिला क्रिकेट पटूमध्ये खूपच उत्साह संचारला होता.

# गरजेपोटी बांधलेल्या घरांची शास्ती रद्द करा

## वनमंत्री गणेश नाईक यांच्या सूचना

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

नवी मुंबई महापालिका हद्दीतील गाव गावठाण आणि इतर सर्व गरजेपोटीच्या घरांना लावण्यात आलेली जाचक शास्ती रद्द करण्याची सूचना वनमंत्री गणेश नाईक यांनी नवनिर्वाचित महापौर, उपमहापौर आणि गटनेत्यांना दिल्या आहेत. त्याचबरोबर मागील पाच ते सहा वर्षांमध्ये महापालिका प्रशासकीय कार्यकाळात झालेल्या कामकाजाबाबत श्वेतपत्रिका काढण्यासाठी समिती गठीत करण्याची सूचना देखील दिल्या आहेत.

वनमंत्री नाईक यांनी रविवारी नवनिर्वाचित महापौर सुजाता पाटील, उपमहापौर दशरथ भगत, माजी महापौर आणि विद्यमान गटनेते सागर नाईक यांची बैठक घेतली. या बैठकीला माजी खासदार डॉक्टर संजीव नाईक, माजी आमदार संदीप नाईक उपस्थित होते.

वनमंत्री नाईक यांच्या नेतृत्वात नवी मुंबई महापालिका निवडणुकीमध्ये भारतीय जनता पक्षाला पूर्ण बहुमत मिळाले असून ५ फेब्रुवारी २०२६ रोजी झालेल्या निवडणुकीमध्ये महापौरपदी सुजाता पाटील आणि उपमहापौरपदी दशरथ भगत यांची बिनविरोध निवड झालेली आहे. निवडीनंतर लगेचच जनहिताच्या आणि शहरी विकासाच्या दृष्टीने निर्णय घेण्याचे निर्देश नाईक यांनी पालिका पदाधिकाऱ्यांना दिले आहेत. नवी मुंबईमध्ये गाव, गावठाण तसेच इतर गरजेपोटीची घरे बांधण्यात आली आहेत. त्याला प्रशासनाने तीनपट शास्ती आकारली आहे. ही शास्ती रद्द करण्याच्या अनुषंगाने महापालिकेच्या आगामी सर्वसाधारण सभेमध्ये पटलावर विषय घेण्यात येणार आहे. लोकप्रतिनिधी तसेच सभागृह अस्तित्वात येण्यापूर्वी मागील ५ ते ६ वर्षांमध्ये नवी मुंबई महापालिकेत प्रशासकीय कारभार सुरू होता.



प्रशासकीय कालावधीत झालेल्या कारभाराविषयी अनेक आक्षेप नोंदवले गेले आहेत. त्यामुळे प्रशासकीय कालावधीतील कामकाजाची वस्तुस्थिती समोर आणण्यासाठी एक श्वेतपत्रिका काढण्यासाठी देखील उच्चस्तरीय समिती गठीत करण्यात येणार आहे. येणाऱ्या मार्च महिन्यामध्ये महापालिकेचा अर्थसंकल्प सादर होणार आहे. मंत्री नाईक यांनी शब्द दिल्याप्रमाणे मागील २५ वर्षे नवी मुंबईमध्ये कोणत्याही प्रकारची मालमत्ता कर किंवा पाणीपट्टी वाढ करण्यात आलेली नाही. भविष्यातदेखील मालमत्ता कर किंवा पाणीपट्टी वाढविण्यात येणार नाही, असा शब्द वनमंत्री नाईक यांनी नवी मुंबईच्या जनतेला दिलेला आहे. त्यामुळे कोणत्याही प्रकारची करवाढ न करण्याच्या दृष्टीने देखील कार्यवाही सुरू करण्यात येणार आहे. त्याबरोबरच आरोग्य, शिक्षण, पर्यावरण, प्रदूषण नियंत्रण कृती आराखडा, ठोक मानधन कामगारांचे विषय, अन्य कर्मचारी आणि कामगारांचे विविध प्रलंबित प्रश्न असे विषय येत्या महापालिकांच्या सर्व साधारण सभांमध्ये मार्गी लावण्यात येणार आहेत. महापालिकेच्या विविध विषय समित्या गठीत करण्याची कार्यवाही सुरू करण्यात येणार आहे.

गरजेपोटीच्या घरांची शास्ती रद्द करण्याच्या मंत्री गणेश नाईक यांच्या सूचना प्रशासकीय काळातील कामकाजाची श्वेतपत्रिका काढण्यासाठी समिती गठित होणार असून विविध विषय समित्या गठीत करण्याची सूचना नवनिर्वाचित महापौर, उपमहापौर आणि गटनेत्यांना दिल्या आहेत. मागील पाच ते सहा वर्षांमध्ये महापालिका प्रशासकीय कार्यकाळात झालेल्या कामकाजाबाबत श्वेतपत्रिका काढण्यासाठी समिती गठीत करण्याची सूचना देण्यात आल्या आहेत.

# उरणमधील स्वराज पाटीलचा नवा विक्रम

## कासा खडक ते खांदेरी किल्ला सागरी अंतर पाच तासांत केले पार

**उरण : बातमीदार**

जीवनात जिद्द, चिकाटी आणि आत्मविश्वास असेल तर हमखास यश मिळते, याची प्रचिती उरण, बाजारपूर येथे राहणाऱ्या अवघ्या १२ वर्षीय स्वराज सोनाली संतोष पाटीलने दिली आहे. स्वराजने कासा खडक ते खंदेरी किल्ला हे तब्बल १८ कि.मी.चे सागरी अंतर ५ तास ६ मिनिटांत पोहून पार करत हा धाडसी पराक्रम केला. तो उरणच्या सेंट मेरीज कॉन्व्हेंट स्कूलमध्ये सातवी इयत्तेत शिक्षण घेत असून, त्याने आपल्या आईकडून मिळालेला जलतरणाचा वारसा यशस्वीपणे पुढे नेला आहे.

याआधीही स्वराजने उरणमधील मोरा जेट्टी ते मुंबई गेटवे ऑफ इंडिया हे १२ कि.मी.चे सागरी अंतर ४ तास २५ मिनिटांत पोहून पूर्ण केले होते. उरण नगर परिषदेच्या जलतरण तलावात तो नियमित आणि कठोर सराव करत असतो.

शनिवारी रात्री ११ वाजून ५० मिनिटांनी कासा खडक येथून स्वराजने आपल्या सागरी मोहिमेला सुरुवात केली. काळोख, समुद्रातील प्रचंड लाटा, सोसाट्याचा वारा तसेच मोठमोठी जहाजे अशा अनेक अडथळ्यांवर मात करत त्याने अवघ्या ५ तास ६ मिनिटांत खंदेरी किल्ला गाठून इतिहास घडवला आहे. स्वराज हा कमी वयात कमी वेळेत पोहून विक्रम करणारा पहिला जलतरणपटू ठरला आहे.



या धाडसी कामगिरीसाठी स्वराजचे सर्वत्र कौतुक होत आहे. एवढ्या लहान वयात इतका मोठा सागरी पराक्रम करणारा स्वराज हा उरण तालुक्याचा अभिमान ठरला आहे. त्याच्या या यशामागे कठोर सराव, शिस्तबद्ध जीवनशैली आणि कुटुंबाचा भक्कम पाठिंबा कारणीभूत ठरला आहे. विशेषतः त्याच्या आईने दिलेले मार्गदर्शन आणि जलतरणाची परंपरा पुढे नेण्याची प्रेरणा यामुळेच स्वराज हे यश मिळवू शकला आहे.

या मोहिमेदरम्यान स्वराजच्या सुरक्षिततेसाठी बोट, प्रशिक्षक, तसेच सहकारी जलतरणपटू यांची योग्य ती व्यवस्था करण्यात आली होती. संपूर्ण प्रवासादरम्यान त्याच्या आरोग्यावर आणि वेळेवर विशेष लक्ष ठेवण्यात आले. समुद्रातील प्रतिकूल परिस्थिती असूनही स्वराजने कोणतीही भीती न बाळगता आत्मविश्वासाने पोहणे सुरू ठेवले, हे विशेष उल्लेखनीय आहे.

भविष्यात आणखी मोठी सागरी आव्हाने पेलण्याचा स्वराजचा मानस असून इंग्लिश चॅनेलसारख्या आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये देशाचे नाव उज्वल करण्याचे स्वप्न तो पाहत आहे. त्याच्या या यशामुळे अनेक लहान मुलांना जलतरणाकडे व खेळाकडे वळण्याची प्रेरणा मिळणार आहे.

स्वराज पाटीलचा हा विक्रम म्हणजे जिद्द, चिकाटी आणि सातत्य यांचे जिवंत उदाहरण असून योग्य मार्गदर्शन आणि मेहनत असेल तर वय कधीच अडथळा ठरत नाही हे त्याने सिद्ध करून दाखवले आहे.

# खारघरच्या रामशेठ ठाकूर महाविद्यालयात बिझ कॉम रिफ्लेक्शन मासिकाचे प्रकाशन

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात सोमवारी (दि.९) कॉमर्स असोसिएशनने वार्षिक मासिकाचा, बिझ कॉम रिफ्लेक्शन २०२५-२६' चा चौथा खंड प्रकाशित केला, ज्यामध्ये विद्यार्थी आणि प्राध्यापकांनी लिहिलेले ५४ ज्ञानवर्धक लेख समाविष्ट आहेत.



या समारंभास महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. महेश्वरी झिरपे यांनी उपस्थित राहून मासिकाचे प्रकाशन केले तसेच या वेळी उपस्थित सर्व विद्यार्थी व शिक्षकांना मोलाचे मार्गदर्शन केले, यावेळी प्रा. प्रथमेश उदेकर,समन्वयक अंतर्गत गुणवत्ता सिद्धता कक्ष, तसेच कॉमर्स असोसिएशनचे समन्वयक डॉ. प्रवर शर्मा यांनी कार्यक्रमाची प्रस्तावना केली, प्रा. विशाल देशमुख, प्रा. डॉ. रीत ठुले,प्रा. राजश्री म्हात्रे, प्रा. डॉ. नीलम लोहकरे, प्रा. रिजवाना मोमीन सर्व विभाग प्रमुख उपस्थित होते, ज्यामुळे कार्यक्रमाची शोभा वाढली.

या कार्यक्रमासाठी कॉमर्स असोसिएशनचे सर्व सदस्य, विद्यार्थी व शिक्षकेतर कर्मचारी यांनीही मोलाचे योगदान दिले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. तनुजा सुमन यांनी केले.

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com

### माणगाव व इंदापूर येथे सलग दोन दिवस

# वाहतूक कोंडीचा मनस्ताप

**पाली : प्रतिनिधी**

माणगाव व इंदापूर येथे शनिवारी व रविवारी सलग दोन दिवस प्रवासी व पर्यटकांना वाहतूक कोंडीचा फटका बसला आहे. त्यामुळे प्रवाशांना मनस्ताप सहन करावा लागला. याच मार्गावर वाकण नाका येथे तसेच कोलाड येथे देखील मोठ्या प्रमाणावरती वाहतूक कोंडीचा सामना करावा लागला.

इंदापूर ते माणगाव येथे सतत वाहतूक कोंडी होत आहे. या दोन्ही ठिकाणी बाह्यवळण मार्गाचे काम अनेक वर्षांपासून खोळंबले आहे. परिणामी इंदापूर व माणगाव या गावातूनच वाहने जातात. येथील अरुंद रस्ता असल्यामुळे दोन्हीकडचे वाहनांना जाण्यास अडथळा निर्माण होतो आणि वाहनांच्या लांबच लांब रांगा लागतात. शिवाय कोलाड या ठिकाणी फ्लायओव्हरचे काम सुरू आहे. तिथेदेखील कोंडी होते. वाकण नाक्यावरदेखील तिन्ही बाजूने वाहने येत असल्यामुळे कोंडी होते.



शनिवारी व रविवारी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या कालखंडात मुंबई-गोवा महामार्गावर अवजड वाहतुकीला बंदी असल्यासंदर्भात जिल्हा प्रशासनाने अधिसूचना जाहीर केली, पण याबाबत अंमलबजावणी केली नाही. कारण दोन्ही दिवस येथून मोठ्या प्रमाणावर अवजड वाहतूक सुरू होती. याचा त्रास प्रवासी व वाहन चालक आणि पर्यटकांना झाला.

> **शनिवारी नवी मुंबईवरून श्रीवर्धन येथे सहकुटुंब गावी जाण्यासाठी निघालो असता इंदापूर येथे तब्बल दोन तास वाहतुक कोंडीत अडकलो होतो. रविवारी सायंकाळीदेखील तीच परिस्थिती होती. तेव्हाही वाहतूक कोंडीचा सामना करावा लागला आणि तब्बल दोन तास वाहतूक कोंडीत अडकावे लागले. यामुळे हकनाक खूप त्रासाला सामोरे जावे लागले.**
> **-प्रकाश मुद्राळे,**
> नागरिक, बोर्लीपंचतन, श्रीवर्धन

जिल्हा प्रशासन तसेच पोलीस कोणतीच कारवाई करण्यात कसूर करतांना दिसली, असे सामाजिक कार्यकर्ते कपिल पाटील यांनी सांगितले.

# बौद्ध समाजातील संस्थांना अनुदानासाठी अर्जाचे आवाहन

**रायगड : रामप्रहर वृत्त**

महाराष्ट्र शासनाच्या अल्पसंख्याक विकास विभागामार्फत बौद्ध समाजातील सांस्कृतिक, शैक्षणिक व सामाजिक संस्थांचे बळकटीकरण करण्यासाठी एक महत्त्वपूर्ण अनुदान योजना जाहीर करण्यात आली आहे. या योजनेंतर्गत पात्र संस्थांना त्यांच्या इमारतीमध्ये पायाभूत सोयी-सुविधा निर्माण करण्यासाठी १० लाख रुपयांपर्यंतचे अनुदान उपलब्ध करून दिले जाणार असून इच्छूक पात्र संस्थांनी विहित नमुन्यात अर्ज सादर करावेत, असे आवाहन जिल्हा नियोजन अधिकारी तथा जिल्हा अल्पसंख्याक अधिकारी व सदस्य सचिव, उच्चस्तरीय निवड समिती रायगड-अलिबाग उमेश सुर्यवंशी यांनी केले आहे.

योजनेसाठी पात्रतेचे निकषः संस्था राज्यातील धर्मदाय आयुक्तांकडे नोंदणीकृत असणे आवश्यक आहे. संस्थेच्या विश्वस्त किंवा सदस्यांमध्ये ५१ टक्क्यांपेक्षा जास्त सदस्य हे बौद्ध समाजातील असणे अनिवार्य आहे. संबंधित संस्था सांस्कृतिक, शैक्षणिक किंवा सामाजिक क्षेत्रात कार्यरत असावी. एका संस्थेला या योजनेंतर्गत जास्तीत जास्त ५ वेळा अनुदान घेता येईल.

**अनुदान कोणत्या कामांसाठी मिळेल?**

या योजनेतून शासन निर्णयानुसार इमारतीचे किरकोळ नूतनीकरण व डागडुजी, शुद्ध पेयजल व्यवस्था, ग्रंथालय/अभ्यासिका अद्ययावत करणे, विपश्यना केंद्राची दुरुस्ती, संगणक कक्ष उभारणे, प्रसाधनगृह बांधणे, फर्निचर खरेदी, सौर ऊर्जा उपकरणे, जनरेटर/इन्व्हर्टर आणि सीसीटीव्ही कॅमेरे बसवणे यांसारख्या १३ प्रकारच्या पायाभूत सुविधांसाठी निधी दिला जाईल.

**अर्ज करण्याची पद्धत व मुदत**

इच्छुक पात्र संस्थांनी विहित नमुन्यातील अर्ज (प्रपत्र-१) आणि आवश्यक कागदपत्रांसह आपले प्रस्ताव दि. २० फेब्रुवारी २०२६ जिल्हा नियोजन समिती कार्यालय, नियोजन भवन येथे सादर करावेत, अर्जासोबत नोंदणी प्रमाणपत्र, सदस्यांची यादी (प्रपत्र-३), मालमत्ता पत्रक/७/१२ उतारा, ऑडिट रिपोर्ट आणि सार्वजनिक बांधकाम विभागाच्या उप-अभियंत्यांनी साक्षांकित केलेले अंदाजपत्रक जोडणे आवश्यक आहे.
प्राप्त अर्जाची छाननी जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील उच्चस्तरीय निवड समितीमार्फत केली जाईल. त्यानंतर पात्र संस्थांच्या यादीनुसार शासन निधी वितरित करेल. अधिक माहितीसाठी संस्थांनी जिल्हा नियोजन कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# रोह्यात राष्ट्रवादी आणि शिवसेनेचे उमेदवार विजयी

**रोहा : प्रतिनिधी**

रोहा तालुक्यातील जिल्हा परिषद गट व पंचायत समिती गणाचा निकाल जाहीर झाला असून जिल्हा परिषद गटात राष्ट्रवादी (अजित पवार) गट २ व शिवसेना (शिंदे गट) २ उमेदवार विजयी झाले आहेत. पंचायत समिती गणात राष्ट्रवादी (अजित पवार गट) चे ६, व शिवसेना (उबाठा) १, शिवसेना (शिंदे गट) १ उमेदवार विजयी झाले आहेत.



विजय उमेदवारांच्या कार्यकर्त्यांमध्ये मोठा जल्लोष रोहा तालुक्यात दिसून आला. नागोठणे पंचायत समिती गणात पहीला निकाल आला असुन राष्ट्रवादी (अजित पवार गट) पक्षाची चांगली सुरूवात होत समृध्दी संतोष कोळी या विजयी झाल्या. तर सुकेळी पंचायत समिती गणात उबाठाचे अरुणा जानु हंभीर या विजयी झाल्या आहेत.

नागोठणे जिल्हा परिषद गटात राष्ट्रवादी (अजित पवार गट)ला धक्का बसला असून किशोर जैन पराभुत झाले तर शिवसेना (शिंदे गट) चे उमेदवार सुमीत काते निवडून आले. आंबेवाडी जिल्हा परिषद गटात राष्ट्रवादी (अजित पवार गट)च्या निधी नरेंद्र जाधव या विजयी झाल्या आहेत. कोलाड पंचायत समिती गणात राष्ट्रवादी (अजित पवार गण)चे जगन्नाथ धनावडे हे निवडुन आले आहेत. तर आंबेवाडी पंचायत समिती गण (राष्ट्रवादी अजित पवार गट) चे संजय मांडलुस्कर हे विजयी झाले आहेत.

भुवनेश्वर जिल्हा परिषद गटात राष्ट्रवादी (अजित पवार गट) प्रदेश उपाध्यक्ष मधुकर पाटील दणदणीत मताने विजय झाले आहेत. तर भुवनेश्वर पंचायत समिती गणात राष्ट्रवादी (अजित पवार गट) जिल्हा सरचिटणीस सुरेश मगर हे विजयी झाले आहेत. धाटाव पंचायत समिती गणात राष्ट्रवादी (अजित पवार गट) च्या विजया विनोद पाशिलकर या विजयी झाल्या आहेत.

न्हावे पंचायत समिती गणात शिवसेनेच्या वर्षा हेमंत देशमुख या विजय झाले आहे. घोसाळे पंचायत समिती गणात राष्ट्रवादी (अजित पवार गट)चे ज्येष्ठ नेते किसन गणपत मोरे हे विजयी झाले असुन घोसाळे जिल्हा परिषद गटात शिवसेना उर्वशी उद्देश वाडकर या विजयी झाल्या आहेत.

# माणगाव पंचायत समितीवर पुन्हा एकदा शिवसेनेचा भगवा

### जिल्हा परिषदेच्या चारपैकी शिवसेना व राष्ट्रवादी काँग्रेसकडे प्रत्येकी दोन जागा

**माणगाव : प्रतिनिधी, बातमीदार**

संपूर्ण रायगड जिल्ह्याचे लक्ष वेधून राहिलेल्या माणगाव तालुक्यातील रायगड जिल्हा परिषदेच्या चार जागांपैकी प्रत्येकी दोन जिल्हा परिषद गटांवर शिवसेना शिंदे गट व राष्ट्रवादी काँग्रेसचे उमेदवार निवडून आले असून माणगाव पंचायत समितीवर पुन्हा एकदा शिवसेनेचा भगवा फडकला आहे.





माणगाव येथील जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूक राष्ट्रवादी काँग्रेसचे खासदार सुनील तटकरे, मंत्री आदिती तटकरे व शिवसेनेचे मंत्री भरत गोगावले यांनी प्रतिष्ठेची केली होती. यामध्ये शिवसेना पक्षाने जोरदार मुसंडी मारली. जिल्हा परिषदेच्या दोन जागा व पंचायत समितीच्या पाच जागांवर शिवसेनेचे उमेदवार निवडून आल्यावर माणगाव तहसील कार्यालय येथील मैदानात शिवसैनिकांनी घोषणाबाजी व गुलालाची उधळण करीत जयघोष केला.

राष्ट्रवादी काँग्रेसचा बालेकिल्ला म्हणून ओळखला जाणारा मोर्बा जिल्हा परिषद गट व मोर्बा पंचायत समिती गणातून तसेच तळाशेत जिल्हा परिषद गट,पंचायत समिती गण व साई पंचायत समिती गणातून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे उमेदवार निवडून आल्यावर राष्ट्रवादी पक्षाच्या कार्यकर्त्यांनी विजयाचा जल्लोष केला. माणगाव तहसील कार्यालय याठिकाणी निवडणुकीचे निवडणूक निर्णय अधिकारी तथा माणगावचे प्रांताधिकारी डॉ.संदीपान सानप यांच्या अधिपत्याखाली सोमवार, ९ फेब्रुवारी रोजी मतमोजणी प्रक्रिया शांततेत पार पडली. या मतमोजणीवेळी तहसील कार्यालय माणगाव याठिकाणी उपविभागीय पोलीस अधिकारी सविता सविता गर्जे व माणगाव पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक निवृत्ती बोऱ्हाडे यांच्या मार्गदर्शनाखाली कडेकोट पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता

तालुक्यातील निजामपूर जिल्हा परिषद गटातून शिवसेनेचे अविनाश नलावडे विजयी झाले. त्यांनी आपले प्रतिस्पर्धी उमेदवार राजिपचे माजी सभापती अॅड. राजीव साबळे यांचा पराभव केला. तळाशेत जिल्हा परिषद गटातून राष्ट्रवादी काँग्रेसच्या दिशा दिपक जाधव या विजयी झाल्या. त्यांनी आपले प्रतिस्पर्धी उमेदवार राजिपच्या माजी सदस्या स्वाती नवगणे यांचा दारुण पराभव केला. मोर्बा जिल्हा परिषद गटातून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे माजी जिल्हा परिषद सभापती अस्लम राऊत यांनी आपले कट्टर प्रतिस्पर्धी उमेदवार शिवसेनेचे रमेश मोरे यांचा पराभव केला. गोरेगाव जिल्हा परिषद गटातून शिवसेनेचे दिनेश हरवंडकर यांनी आपले प्रतिस्पर्धी उमेदवार राष्ट्रवादी काँग्रेसचे भारत गोरेगावकर यांचा पराभव केला.

माणगाव पंचायत समिती निवडणुकीत पाटुणूस पंचायत समिती गणातून शिवसेनेचे विलास शिंदे, निजामपूर पंचायत समिती गणातून शिवसेनेचे अक्षय जाधव, तळाशेत पंचायत समिती गणातून राष्ट्रवादी काँग्रेसचे मनीषा मालोरे, साई पंचायत समिती गणातून राष्ट्रवादी काँग्रेसच्या माजी पंचायत समिती सदस्या तथा तालुका महिला आघाडी राष्ट्रवादी काँग्रेसच्या अध्यक्षा संगीता संजय बक्कम, वडवली पंचायत समिती गणातून शिवसेनेचे ज्ञानदेव पदरत, मोर्बा पंचायत समिती गणातून जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेसचे कार्याध्यक्ष सुभाष केकाणे यांच्या पत्नी अलका केकाणे, गोरेगाव पंचायत समिती गणातून शिवसेनेचा स्वाती करकरे, लोणेरे पंचायत समिती गणातून शिवसेनेचे रवींद्र टेंबे हे उमेदवार विजयी झाले.

# नागोठण्यात शिवसेनेचे सुमित काते विजयी

**नागोठणे : बातमीदार**

नागोठणे जिल्हा परिषद गटातून परिवर्तन विकास आघाडीचे (शिंदे शिवसेना, ठाकरे शिवसेना, काँग्रेस व आपआय आघाडी) शिंदे शिवसेनेचे उमेदवार सुमित काते यांनी राष्ट्रवादी काँग्रेसचे दिग्गज नेते किशोर जैन यांचा ५२४० मतांनी पराभव करत विजय मिळवला आहे.

नागोठणे पंचायत समितीतुन राष्ट्रवादीच्या समृद्धी संतोष कोळी यांनी ठाकरे शिवसेनेच्या अंजली हिराजी दुर्गावले यांचा ४४१ मतांनी पराभव करून विजय मिळविला व सुकेळी पंचायत समितीतून ठाकरे शिवसेनेच्या अरुणा हंबीर यांनी भाजपच्या योगिता शिद यांचा ५९० मतांनी पराभव करून विजय मिळविला. नागोठणे जिल्हा परिषदेमध्ये सुमित काते यांच्या विजयामुळे नागोठणे परिसरातील राजकीय समीकरणे पूर्णपणे बदलली असल्याचे चित्र स्पष्ट झाले आहे.



विजयानंतर नागोठणे छत्रपती शिवाजी महाराज चौकात सुमित काते यांच्या समर्थकांनी फटाक्यांच्या अतिशबाजी करीत गुलालाची उधळण करीत जल्लोष साजरा केला. या वेळी शिंदे शिवसेनेचे रोहा तालुका प्रमुख मनोज खांडेकर, विभाग प्रमुख प्रविण ताडकर, शहर प्रमुख संतोष चितळकर, संदीप वाजे, अमित खांबकर, संजय कणघरे, भास्कर बावदाने, ठाकरे शिवसेनेचे उपतालुका प्रमुख गणपत म्हात्रे, अजय दळवी, लहूशेठ तेलंगे, प्रशांत भोईर, हिराजी दुर्गावले, इम्रान पानसरे, ग्रामपंचायत सदस्या ज्योती राऊत काँग्रेसचे जिल्हा सरचिटणीस सद्दाम दफेदार, शहर अध्यक्ष अशपाक पानसरे, शब्बीरशेठ पानसरे, नागोठणे माजी सरपंच निलोफर पानसरे, ग्रामपंचायत सदस्या शबाना मुल्ला, असिफ मुल्ला, याकूब सय्यद, नासिम अधिकारी, सोहेल पानसरे, आरपीआय तालुका अध्यक्ष संतोष गायकवाड यांच्यासह परिवर्तन विकास आघाडीचे असंख्य कार्यकर्ते सहभागी झाले होते.

# श्रीवर्धनमध्ये राष्ट्रवादी काँग्रेसचा दणदणीत विजय

### पं.स.त राष्ट्रवादीचे दोन, तर भाजप आणि शिंदे गटाचा प्रत्येकी एक उमेदवार विजयी

**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

जिल्हा परिषद व पंचायत समिती सार्वत्रिक निवडणूक २०२६च्या निकालातून श्रीवर्धन तालुक्यात राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीने आपले राजकीय वर्चस्व पुन्हा एकदा ठामपणे सिद्ध केले आहे. जिल्हा परिषदेच्या दोन्ही मतदारसंघांमध्ये राष्ट्रवादीच्या उमेदवारांनी निर्णायक व विश्वासार्ह विजय मिळवत विकासाच्या राजकारणाला मतदारांनी दिलेली स्पष्ट पोचपावती अधोरेखित केली आहे.



तालुक्यातील सर्वसामान्य जनतेपर्यंत पोहचलेल्या विकासकामांचा, लोकाभिमुख धोरणांचा आणि सातत्यपूर्ण पाठपुराव्याचा परिणाम या निकालातून स्पष्टपणे दिसून येतो. खासदार सुनील तटकरे, महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे तसेच आमदार अनिकेत तटकरे यांच्या नेतृत्वाखाली श्रीवर्धन तालुक्यात राबविण्यात आलेल्या पायाभूत सुविधा, महिला-बालकल्याण, आरोग्य, रस्ते, पाणीपुरवठा व सामाजिक विकासाच्या कामांवर मतदारांनी शिक्कामोर्तब केल्याची भावना विजयी उमेदवारांच्या प्रतिक्रियांतून व्यक्त होत आहे.

या निकालातून श्रीवर्धन तालुक्यात राष्ट्रवादी काँग्रेसचा जनाधार आजही भक्कम असल्याचे स्पष्ट झाले आहे. जिल्हा परिषद व पंचायत समिती या दोन्ही महत्त्वाच्या स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये पक्षाची निर्णायक भूमिका कायम राहणार असून, आगामी काळात विकासाचा वेग अधिक वाढेल, अशी अपेक्षा नागरिकांमधून व्यक्त होत आहे.

# तळा तालुक्यात राष्ट्रवादीचा जि.प., पं.स. सर्व जागांवर विजय

**तळा : प्रतिनिधी**

तळा तालुका हा राष्ट्रवादीचा बालेकिल्ला असून पुन्हा एकदा सर्वच्या सर्व दोन जिल्हा परिषद व चार पंचायत समिती उमेदवार विजयी होत, पं.समिती वरती आता राष्ट्रवादीचा पुन्हा एकदा झेंडा फडकला आहे.



जि.प.व पं.स.च्या ७ फेब्रुवारी रोजी झालेल्या सार्वत्रिक निवडणुकीत ४३ चरई खर्द जिल्हा परिषद गटात राष्ट्रवादीच्या गिताताई जाधव यांना ६७८३ मते मिळाली तर शिवसेनेच्या अस्मिता शिगवण यांना १५२९ मते मिळाली व शेकापच्या करूणा पातेरे यांना २२९ मते मिळाली यामधे राष्ट्रवादीच्या गिता जाधव या उमेदवार ५२५४ मताधिक्याने विजयी झाल्या आहेत.

४४ रहाटाड जिल्हा परिषद गटात राष्ट्रवादीच्या नलिनी नरेंद्र लोखंडे यांना ५०९८ मते मिळाली तर शिवसेनेच्या रोहिणी रमेश पिंपळे यांना २७७० मते मिळाली असून राष्ट्रवादीच्या नलिनी लोंखडे या उमेदवार २३२८ मतांनी विजयी झाल्या आहेत.

८५ बोरघरहवेली पंचायत समिती गटात राष्ट्रवादीचे रविंद्र गणपत मांडवकर यांना ३६२५ मते मिळाली तर शिवसेनेचे अनंत वामन खराडे यांना ३८१ मते मिळाली व अपक्ष संतोष नामदेव आमले यांना ४६६ मते मिळाली या लढतीत राष्ट्रवादीचे रविंद्र मांडवकर हे उमेदवार ३१५९ मतांनी विजयी झाले आहेत.

पंचायत समिती चरई खुर्द गणात राष्ट्रवादीच्या अक्षरा सचिन कदम यांना २७८७ मते मिळाली तर शिवसेनेच्या सुलभा संतोष काप यांना १२१४ मते मिळाली असून यामधे राष्ट्रवादीच्या अक्षरा कदम या उमेदवार १५७३ मतांनी विजयी झाल्या आहेत.

विजयी उमेदवारांची घोषणा करताच कार्यकर्त्यांनी आनंद व्यक्त करत सर्व विजयी उमेदवारांचे पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले. या वेळी तालुक्यातील राष्ट्रवादीचे तालुकाध्यक्ष नाना भौड, महिला अध्यक्षा जान्हवी शिंदे, नगराध्यक्षा माधुरी घोलप, उपनगराध्यक्ष चंद्रकांत रोडे, पक्षाचे पदाधिकारी उत्तम जाधव, देवा रामाणे, प्रविण आंबार्ले, विठोबा साबळे, दिलीप घाणेकर, रामदास मोरे, दामोदर काते, निकीता गायकवाड, नागेश लोखंडे आदी उपस्थित होते.


महावितरण

**निविदा सुचना**

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीच्या संचालन व सुव्यवस्था विभाग, अलिबाग कार्यालयाअंतर्गत असणारे लघुदाब व उच्चदाब वाहिन्या आणि वितरण रोहित्रे यांच्या ब्रेकडाऊन देखभाल व दुरुस्तीच्या कामासाठी आणि नवीन सेवा जोडण्यासाठी पायाभूत सुविधांचा विकास (NSC) योजनेकरिता वर्ष २०२६-२७च्या करारासाठी परवानाधारक विद्युत ठेकेदारांची नामिकाप्रविष्ट (Empanelment) करणेसाठी, अलिबाग विभागाअंतर्गत अलिबाग-१ उपविभागातील ग्राहकांचे रिडिंग घेणेसाठी, वीज देयके छपाई व वाटप करण्यासाठी (अंदाज पत्रकीय रक्कम :- १९८.४१ लाख) आणि अलिबाग विभागाअंतर्गत महाराष्ट्रातील विविध स्टोअरमधून प्राप्त झालेले ९ MT प्रति पॅकेज पर्यंत वजनाचे साहित्य/उपकरणे यांच्या वाहतुकीसह साहित्य/हाताळणीसाठीच्या कराराकरिता (अंदाज पत्रकीय रक्कम :- ०५.०० लाख) ई-निविदा क्रमांक टी-०१, टी-०२, टी-०३, टी-०४/२०२६-२७, टि-१७/०२-२०२६, टि-१८/०२-२०२६ एकूण ६ निविदा महावितरण कंपनीच्या https://etender.mahadiscom.in/eatApp/ संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आल्या आहेत. सदर निविदा विक्रीसाठी दि.१०.०२.२०२६ ते २४.०२.२०२६(रात्रौ ११.५० वा.) पर्यंत उपलब्ध राहतील. निविदा भरण्याची अंतिम तारिख दि. २४.०२.२०२६ ला रात्रौ ११.५५ वाजेपर्यंत आहे. निविदेच्या आवृत्तीत/ शुद्धीपत्रातील कोणताही बदल यापुढे आमच्या संकेत स्थळावर प्रकाशित केला जाईल.

**PRO NO-021** | **कार्यकारी अभियंता, अलिबाग विभाग**

